रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

• वर्ष १८ • अंक ३४०
www.ramprahar.com

• रविवार, २८ जून २०२६ • पाने ८ • किंमत ₹ २


## अंतरंग


पावसाने मारली दडी; उष्णतेमध्ये झाली वाढ/२

घणसोली-ऐरोली पुलाचे २५ टक्के काम पूर्ण/६

हॉकीत भारताचे पाकवर वर्चस्व कायम!/८


## पनवेलमध्ये जीबीएसचे दोन रुग्ण; आरोग्य विभाग सतर्क




**पनवेल :** येथील परिसरात गिलेन-बॅरी सिंड्रोम (जीबीएस) या दुर्मीळ ऑटोइम्यून आजाराचे दोन रुग्ण उपचार घेत असल्याचे आढळल्याने पनवेल महापालिकेची आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. दोन्ही रुग्णांचा प्रवासाचा इतिहास असून ते पनवेल महापालिका हद्दीबाहेरील रहिवासी आहेत. एक तरुण उपचारानंतर घरी परतला असून ७१ वर्षीय महिलेवर नवीन पनवेलमधील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. संभाव्य धोका लक्षात घेत पनवेल महापालिकेने प्रतिबंधात्मक उपाययोजनेची जनजागृती सुरू केली आहे. पहिला रुग्ण चौक येथील रहिवासी असून जर्मनीहून सुट्टीसाठी विचुंबेत आला होता. चौकजवळील वावंडळ गावात वास्तव्यास असताना त्याला अशक्तपणा जाणवू लागला. ६ जूनला नवीन पनवेल येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारानंतर १५ जूनला त्याला रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. दुसऱ्या रुग्ण मूळच्या कोकणातील रहिवासी आहेत.

# किल्ले रायगड निनादला!

## तिथीनुसार शिवराज्याभिषेकाचा उदंड उत्साह





**महाड : प्रतिनिधी**

किल्लेरायगडावर शनिवारी (दि. २७) तिथीनुसार शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पाऊस असूनही या सोहळ्यासाठी लाखो शिवभक्त गडावर उपस्थित होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी रायगड किल्ला आणि परिसराच्या विकासासाठी शासन निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही दिली.

छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५३वा राज्याभिषेक दिन रायगडावर पारंपरिक पद्धतीने साजरा झाला. पाऊस लांबला असला तरी गडावर शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने चैतन्य निर्माण झाले होते. पारंपरिक वेषातील शिवभक्त, ढोलताशांचा गजर आणि मर्दानी खेळामुळे गडावर शिवकाल अवतरला होता. शाहिरांच्या शाहिरीने गडावर शिवभक्तांमध्ये जल्लोष निर्माण झाला होता आणि संपूर्ण आसमंत छत्रपती शिवरायांच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. सकाळीच राजसदरेवर मंत्रघोषात शिवराज्याभिषेक सोहळ्याला सुरुवात झाली. यावेळी सप्त नद्यांच्या पाण्याने आणि दुधाने महाराजांच्या मूर्तीवर अभिषेक करण्यात आला.

यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, रोहयो मंत्री भरत गोगावले, ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम, गोव्याचे मंत्री सुहास देसाई, जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक आचल दलाल यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते. आपल्या भाषणात उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दुर्गराज रायगडावरील पाण्याची समस्या कायमस्वरूपी दूर करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार गुरुत्वाकर्षण आधारित पाणीपुरवठा योजनेस तातडीने मान्यता देण्यात येईल, असे जाहीर केले. यंदा पाऊस लांबला असला तरी महायुती सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.


रायगड किल्ला हा स्वाभिमानाचा कणा आहे. गडावर आल्यावर प्रेरणा मिळते. साडेतीनशे वर्षांपूर्वी डोळे दीपवणारा सोहळा याच ठिकाणी झाला आणि छत्रपती शिवाजी महाराज राजे झाले. हा केवळ राजकीय सोहळा नव्हता तर नव्या युगाची सुरुवात होती. त्यामुळे स्वराज्य, स्वधर्म जागृत झाला, असे शिंदे म्हणाले. प्रास्ताविकात मंत्री भरत गोगावले यांनी रायगड किल्ला आणि पायथ्याशी असलेल्या ऐतिहासिक वास्तूंच्या जतन व पुनरुज्जीवनासाठी (पान २ वर..)

## टीईटीचाही पेपर फुटला | ठाण्यात प्रश्नपत्रिका लीक, नियोजित परीक्षा ऐनवेळी रद्द

**ठाणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेचा (टीईटी) पेपर ठाण्यात फुटल्याचा संशय आल्याने प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून रविवारी २८ जून रोजी होणारी परीक्षा रद्द केली आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील लाखो उमेदवारांचे भवितव्य पुन्हा टांगणीला लागले आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार ठाणे परिसरातून प्रश्नपत्रिका लीक झाल्याची माहिती संबंधित यंत्रणांना मिळाल्यानंतर प्रशासनाने तातडीने हा निर्णय घेतला. या घटनेमुळे राज्यभरातील लाखो उमेदवारांचा हिरमोड झाला आहे. अनेक विद्यार्थी परीक्षा




केंद्रांकडे जाण्याची तयारी करीत असतानाच त्यांना परीक्षा रद्द झाल्याची माहिती मिळाली.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी नीट परीक्षेतील पेपरफुटीमुळे देशभरात मोठा वाद निर्माण झाला होता. प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून पेपरफुटीमागील नेमके कारण व जबाबदार व्यक्तींचा शोध घेण्याचे काम यंत्रणांकडून सुरू आहे. नव्या तारखेबाबत अधिकृत घोषणा लवकरच अपेक्षित आहे.

### तीन आरोपी ताब्यात

टीईटीची परीक्षा प्रश्नपत्रिका फुटल्याच्या संशयावरून पुढे ढकलण्यात आल्यानंतर याप्रकरणी मोठी माहिती समोर आली आहे. टीईटीचा पेपर तब्बल दीड कोटींना विकला जाणार होता, अशी माहिती अतिरिक्त पोलीस आयुक्त अशोक दुधे यांनी भिवंडी येथे पत्रकार परिषदेत दिली. याप्रकरणी तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना भिवंडीतील कोनगाव परिसरातून ताब्यात घेण्यात आले. एक आरोपी हरियाणा, तर इतर दोन बिहारचे रहिवासी आहेत.

## शहीद कुटुंबांसाठी जमीन हस्तांतरण पूर्णपणे शुल्कमुक्त

■ राज्य सरकारचा ऐतिहासिक निर्णय

**नागपूर : प्रतिनिधी**

देशरक्षणासाठी प्राणांचे बलिदान देणाऱ्या शहीद जवानांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. यापुढे शहीद जवान व अधिकाऱ्यांच्या वीरमाता, वीरपत्नी, कायदेशीर वारसदारांना शेतीची जमीन हस्तांतरित करताना कोणत्याही प्रकारचे मुद्रांक शुल्क भरावे लागणार नाही. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या महत्त्वपूर्ण निर्णयाची घोषणा केली आहे.

यापूर्वी शहिदांच्या वारसांना मुद्रांक शुल्क भरावे लागत होते, ज्यामुळे कुटुंबांवर आर्थिक ताण येत असे. सरकारची जमीन हस्तांतरित करतानाही हा नियम लागू होता, मात्र महसूल खात्याने घेतलेल्या या नवीन निर्णयामुळे आता या कुटुंबांना पूर्णपणे मुद्रांक शुल्कातून सूट मिळणार आहे.

## सांगलीत लोहगडाची पुनरावृत्ती

### प्रियकराच्या मदतीने पतीची हत्या, झोपेत मृत्यूचा बनाव

**सांगली : प्रतिनिधी**

प्रियकराच्या मदतीने पत्नीने पतीचे हातपाय ओढणीने बांधून छातीवर बसून गळा दाबून खून केल्याची निर्दयी घटना शुक्रवारी (दि. २६) उघडकीस आली. आनंद हणमंत सर्जे (२८) याचा खून करून 'बाहेर मारहाण झाली, घरी येऊन झोपेतच मृत्यू झाला' असा बनाव रचण्यात आला होता, मात्र पोलिसांच्या कसून चौकशीत पत्नी गडबडल्याने खुनाचा उलगडा झाला.

लोहगड येथील प्रियकराच्या मदतीने वाग्दत्त वधूने केतन अगरवालचा खून केल्याच्या घटनेने खळबळ उडाली असतानाच सांगलीत विवाहितेने प्रियकराच्या मदतीने पती झोपेत असताना हातपाय बांधून खून केल्याची घटना समोर आली आहे. पोलिसांकडून मिळालेली प्राथमिक माहिती अशी की, आनंद सर्जे (रा. पोळमळा, सांगली) हा राम मंदिर परिसरात रेडिमेड कपड्याच्या शोरूममध्ये सेल्समन होता. त्याचा प्रेमविवाह झाला असून दोन मुले आहेत. आनंदला अलीकडे दारूचे व्यसन लागले होते. त्यामुळे दोघांमध्ये वाद सुरू होता. यादरम्यान पत्नीचे एका २३ वर्षीय तरुणाशी प्रेमप्रकरण सुरू झाले होते.

गुरुवारी पहाटे पती-पत्नीमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाला. (पान २ वर..)

## निवडक

### रत्नागिरीत ५१ किलोहून अधिक गोमांस जप्त; एकाला अटक

**रत्नागिरी :** फणसवळेत नुकतेच संशयित गोमांसाचे अवशेष सापडल्याच्या घटनेनंतर जिल्ह्यात गोवंश तस्करीविरोधात पोलिसांनी कारवाईची मोहीम सुरू केली आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने रत्नागिरीतील उद्यमनगर परिसरात धाड टाकून ५१ किलो ५०० ग्रॅम संशयित गोमांस जप्त केले. याप्रकरणी एकाला अटक करण्यात आली असून दुचाकी व डिप फ्रिजरसह एक लाख सहा हजार ४८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### मोहरमच्या मिरवणुकीत विषप्रयोगाचा कट उधळला

**मुंबई :** मुंबईतील भायखळा परिसरात



मोहरमच्या मिरवणुकीत सामूहिक विषप्रयोगाचा कट मुंबई पोलिसांनी उधळला आहे. याप्रकरणी पोलिसांनी साधारण १५ हजार विषारी कॅप्सूल्स जप्त करीत संशयित आरोपीला ताब्यात घेतले. मोहरमच्या मिरवणुकीत सहभागींना औषधाच्या नावाखाली विषारी कॅप्सूलचे वाटप सुरू होते. फैयाज प्रेमजी असे संशयिताचे नाव असून तो मूळचा पुण्याचा रहिवासी आहे. आरोपीने पेनकिलर असल्याचे सांगून कॅप्सूल वाटण्यास सुरुवात केली होती.

## राज्यात मुसळधार पावसाचा इशारा

### मुंबई, ठाणे, रायगडसह २४ जिल्ह्यांना यलो अलर्ट

**मुंबई : प्रतिनिधी**

उशिराने दाखल झालेल्या मान्सूनने आता राज्यात जोर धरला असून भारतीय हवामान विभागाने शनिवारी (दि. २७) मुंबई, ठाणे, रायगडसह तब्बल २४ जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट



जारी केला आहे. पुढील २४ ते ४८ तासांत मेघगर्जनेसह जोरदार पाऊस, विजांचा कडकडाट आणि वेगवान वारे वाहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार मुंबई, ठाणे, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. कोकण किनारपट्टीवरील भागांमध्ये समुद्र खवळण्याची शक्यता असल्याने मच्छीमारांनी समुद्रात जाणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांनाही यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागांमध्ये मेघगर्जनेसह मध्यम ते जोरदार पावसाच्या सरी कोसळू शकतात. काही ठिकाणी वीज पडण्याचीही शक्यता असल्याने नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांसाठीही यलो अलर्ट जारी करण्यात आला. उत्तर महाराष्ट्रातील नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यांत काही ठिकाणी अतिवृष्टीसदृश परिस्थितीची शक्यता हवामान विभागाने वर्तवली. नदीनाल्यांच्या परिसरात राहणाऱ्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा अंदाज आहे.






## आज पनवेलमध्ये 'पुरवैय्या' सांगीतिक संध्याकाळ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल यांच्या वतीने आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख सहयोगाने 'पुरवैय्या' हा




विशेष सांगीतिक कार्यक्रम रविवारी (दि. २८) रात्री ८ वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे संपन्न होणार आहे. बांगला संगीतकारांच्या मधुर हिंदी गाण्यांचा अनोखा सुरांचा उत्सव पनवेलकर रसिकांसाठी एक आगळावेगळा अनुभव ठरणार आहे.

विशेष म्हणजे या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य आहे. कार्यक्रमात सुप्रसिद्ध कलाकारांचा सहभाग असून मुख्य निवेदक व सहआयोजक म्हणून पुष्कर श्रोत्री, गायक म्हणून अजित परब, अर्चना गोरे आणि मुक्ता जोशी तर निवेदिका व सहआयोजिका म्हणून योगिनी पोफळे सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाचे लेखन प्रवीण जोशी यांनी केले आहे. रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सुरेल मैफिलीचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## स्विमिंग पूलमधील उडी बेतली जीवावर; तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

**मालवण : प्रतिनिधी**

वायरी येथील एका रिसॉर्टमधील जलतरण तलावात शनिवारी (दि. २७) दुपारी 'जिंदगी जिंदगी' गाण्यावर डान्स करत उंचावरून उडी मारणाऱ्या सांगलीच्या २५ वर्षीय श्रेणिक टाकळे याचा डोके तळाशी जोरात आपटून मृत्यू झाला. आठ ते १० फूट उंचीवरून चार फूट खोल पाण्यात उडी घेतल्याने ही दुर्घटना घडली. घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

वायरी (ता. मालवण) येथील रिसॉर्टमधील जलतरण तलावात उंचावरून उडी मारताना सांगलीतील युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. सांगली जिल्ह्यातील १० मित्रांचा गट शनिवारी पर्यटनासाठी मालवण येथे आला होता. सर्वजण वायरी येथील रिसॉर्टमध्ये वास्तव्यास होते. दुपारी काही मित्र जलतरण तलावात पोहत होते, तर काही तलावाच्या परिसरात होते.

यावेळी जलतरण तलावात डान्स करत असतानाच श्रेणिकनेही डान्स करीतच उंचावरून तलावात उडी मारली, मात्र ही उडी थेट तलावाच्या कमी खोलीच्या भागात गेल्याने त्याचे डोके तळाशी जोरात आपटले.

# ‘आजची लहान मुलेच उद्याच्या भारताचे भविष्य’

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील शिवाजीनगर येथील जिल्हा परिषद शाळेत भारतीय जनता पार्टी उलवे नोड दोन आणि श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले.

यावेळी माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांनी "आजची लहान मुले हेच उद्याच्या भारताचे भविष्य आहे. त्यांचे भविष्य घडविण्याची महत्त्वाची जबाबदारी शिक्षकांची असून त्यांनी ती प्रामाणिकपणे पार पाडावी," असे मतही त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला पनवेल नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष आणि भाजपचे ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे तसेच भारतीय जनता पार्टीचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी रायगड जिल्हा परिषद सदस्या निकिता खारकर, पंचायत समिती सदस्या जिज्ञासा कोळी, पंचायत समिती सदस्य वितेश म्हात्रे, शिवाजीनगर गावाध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर, भाजप पनवेल पश्चिम मंडळाचे उपाध्यक्ष विजय घरत,नाव्हा ग्रामपंचायत चे माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, उलवे नोड दोन युवा मोर्चाचे अध्यक्ष विराज देशमुख, शिवाजीनगर गावचे उपाध्यक्ष व्ही. के. ठाकूर, अमित कडू, शुभांगी कडू, पी. के. ठाकूर, श्रीधर ठाकूर, जे. के. ठाकूर, नंदाताई ठाकूर, गव्हाण विभागीय अध्यक्ष निलेश खारकर, भाजप महिला मोर्चा उलवे नोड दोनच्या अध्यक्षा योगिता भगत यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वितरण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मनापासून अभ्यास करून उज्ज्वल भविष्य घडविण्याचे आवाहन केले. यावेळी मार्गदर्शन करताना सामाजिक बांधिलकी जपत शिक्षणाला प्रोत्साहन देणारा हा उपक्रम उपस्थितांकडून विशेष कौतुकास पात्र ठरला.





## रास्तभाव धान्य दुकानदारांचे प्रश्न प्रलंबित; प्रशासनाने निर्णय घेण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील रास्त भाव धान्य दुकान व किरकोळ रॉकेल विक्रेत्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी पनवेल रास्त भाव धान्य दुकान व रॉकेल विक्रेते संघटनेने केली आहे. या संदर्भात संघटनेचे अध्यक्ष भरत पाटील यांच्या नेतृत्वाखाली रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांना निवेदन देण्यात आले.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, बायोमेट्रिक प्रणालीतील अडचणींमुळे अनेक लाभार्थी धान्यापासून वंचित राहत आहेत. तसेच धान्य व रॉकेल परवान्यांच्या नूतनीकरणास होणारा विलंब, वाहतूक ठेकेदारांकडून पुरविल्या जाणाऱ्या धान्याच्या वजनातील तफावत, वेळेवर धान्य कोटा उपलब्ध न होणे आणि थकीत कमिशन यांसारख्या समस्यांमुळे दुकानदार आर्थिक संकटात सापडले आहेत. याशिवाय, बंद झालेल्या दुकानांच्या जागी नवीन परवाने न देता इतर दुकानदारांवर अतिरिक्त भार टाकण्यात आल्याची तक्रार करण्यात आली आहे.

पनवेल मिशन सुधार मोहिमेअंतर्गत रद्द करण्यात आलेल्या ९,५३२ शिधापत्रिकांची यादीही अद्याप दुकानदारांना उपलब्ध करून देण्यात आलेली नसल्याने लाभार्थी आणि दुकानदारांमध्ये वाद निर्माण होत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

## सलग दोन दिवस सात जणांना चावणारा कुत्रा जेरबंद

**पनवेल** : पनवेल शहरात लाईन आळी परिसरात सलग दोन दिवस सात जणांना चावणारा कुत्रा अखेरीस पनवेल महापालिकेच्या श्वान पथकाने जेरबंद केला आहे.एक फिरस्ता कुत्रा रस्त्यातील पादचाऱ्यांना चावत असल्याची माहिती स्थानिक नगरसेविका दर्शना भोईर यांना काही जागृत नागरिकांनी दिली. त्यांनी तातडीने उपजिल्हा रुग्णालयाचे आरोग्य निरीक्षक डॉ.भगवान गीते, डॉ.मधुलिका लाड यांच्याशी संपर्क साधून चावा बाधित रुग्णांना आवश्यक ते उपचार करण्यास सांगितले. त्याचप्रमाणे महापालिकेच्या श्वान पथकातील डॉग कॅचर निरीक्षक कल्पेश कदम, रोहित कदम, सुमित कदम, किरण सावंत, चालक संजय कदम आदींमार्फत परिसरात दोन दिवस शोध घेवून त्या कुत्र्याला ताब्यात घेतले आहे. त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे.



# ‘चांगले शिक्षण घ्या, मोठे व्हा आणि आपल्या गावाचे नाव उज्ज्वल करा’

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला बळ देणाऱ्या श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाने समाजसेवेची यशस्वी तीस वर्षे पूर्ण केली आहेत. या निमित्ताने भारतीय जनता पार्टी, उलवा नोड–२ आणि श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या संयुक्त विद्यमाने पनवेल तालुक्यातील न्हावा, न्हावा खाडी येथील जिल्हा परिषद शाळा तसेच रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, पंचायत समिती सदस्या जिज्ञासा कोळी, न्हावा ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, उद्योगपती चंद्रकांतशेठ भोईर, माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, जयवंत देशमुख, विजय घरत, ज्येष्ठ नेते अरुणशेठ ठाकूर, उलवा नोड–२चे उपाध्यक्ष सी. एल. ठाकूर, प्रकाश कडू, मीनाक्षी पाटील, चंद्रकांत पाटील, राम मोकल, अनिता मोकल, महिला मोर्चा अध्यक्षा योगिता भगत, किशोर कोळी, सुहास भगत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत म्हणाले की, १९९६ साली स्थापन झालेल्या श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाने समाजसेवेची तीस वर्षे पूर्ण केली आहेत. या तीन दशकांत शिक्षण, आरोग्य आणि विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविण्यात आले. गेल्या अनेक वर्षांपासून वह्यावाटप उपक्रमाची सुरुवात न्हावा येथूनच केली जाते, ही आनंदाची परंपरा असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी, "चांगले शिक्षण घ्या, मोठे व्हा आणि आपल्या गावाचे व विभागाचे नाव उज्ज्वल करा," असा संदेश दिला. तसेच "थोर समाजसेवक आणि प्रत्येकाच्या अडचणीच्या वेळी मदतीला धावून जाणारे नेतृत्व म्हणजे लोकनेते रामशेठ ठाकूर. असे नेतृत्व आपल्या भागाला लाभले, याचा प्रत्येकाने अभिमान बाळगावा," असे मतही त्यांनी व्यक्त केले.





# प्रकल्पग्रस्त ग्रामविकास संस्थेतर्फे एकदिवसीय लाक्षणिक उपोषण



**पनवेल रामप्रहर वृत्त**

प्रकल्पग्रस्त ग्रामविकास संस्थेतर्फे विविध प्रलंबित मागण्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या एक दिवसीय लाक्षणिक उपोषणाची सांगता प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर शांततेत करण्यात आली.

या उपोषणाच्या समारोपावेळी मानव अधिकार संघटनेचे रायगड जिल्हाध्यक्ष श्याम पाटील, सचिव प्रज्ञेश कांबळे, प्रकल्पग्रस्त ग्रामविकास संघटनेचे अध्यक्ष रामचंद्र भगत, उसरली गावचे सरपंच नितीन कृष्णा भगत, माजी सरपंच ॲड. विजय भगत, दीपक घाडगे, विनायक भगत, संदीप भगत, माजी ग्रामपंचायत सदस्या देवयानी देवेंद्र भगत, गावदेवी महिला बचत गटाच्या अध्यक्षा शुभांगी स्वाईन झावरे, संघटनेचे सचिव मनोज अनंत भगत, माजी ग्रामपंचायत सदस्य मच्छिंद्र आत्माराम पाटील, जयवंत नामदेव भगत, विचुंबेचे ज्येष्ठ नेते अभय गोंधळी उर्फ गोट्या, जयदास बापू चौधरी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, CLSO समाधान खटकाळे आणि मुख्य नियोजनकार अशुतोष उईके यांनी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या निश्चित वेळापत्रकानुसार पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी आजचे उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला. उपोषणादरम्यान प्रशासन आणि रेल्वे प्रशासनाच्या वतीने मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. कोणताही अनुचित प्रकार न घडता आंदोलन शांततेत पार पडले. मात्र, प्रशासनाने दिलेल्या लेखी आश्वासनाची वेळेत अंमलबजावणी न झाल्यास पुढील आंदोलन बेमुदत उपोषणाच्या स्वरूपात करण्यात येईल, असा इशारा प्रकल्पग्रस्तांनी प्रशासनाला दिला आहे.





**पनवेल : उत्तर रायगड भारतीय जनता युवा मोर्चाचे सचिव शुभम पाटील यांना वाढदिवसानिमित्त अनेक मान्यवरांनी शनिवारी शुभेच्छा दिल्या.माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील तसेच अंकुश पाटील यांनी शुभम पाटील यांना भेटून वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी मान्यवरांनी शुभम पाटील यांनी युवा मोर्चाच्या माध्यमातून केलेल्या संघटनात्मक आणि सामाजिक कार्याचे कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. आगामी काळातही समाजसेवा आणि जनतेच्या प्रश्नांसाठी ते अधिक जोमाने कार्य करतील, असा विश्वासही मान्यवरांनी व्यक्त केला. वाढदिवसानिमित्त कार्यकर्ते, मित्रपरिवार आणि शुभचिंतकांनी शुभम पाटील यांना शुभेच्छा देत त्यांच्या दीर्घायुष्य आणि यशस्वी वाटचालीसाठी सदिच्छा व्यक्त केल्या.**

# कालसेकर टेक्निकल कॅम्पसमध्ये करिअर मार्गदर्शन व गुणवंत विद्यार्थी गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अंजुमन–ए–इस्लामच्या कालसेकर टेक्निकल कॅम्पस (AIKTC), न्यू पनवेल येथे करिअर मार्गदर्शन व एसएससी–एचएससी गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचे यशस्वी आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना योग्य करिअर मार्गदर्शन मिळावे आणि गुणवंत विद्यार्थी तसेच पालकांचा गौरव व्हावा हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. याकार्यक्रमाला मुंबई, नवी मुंबई, कोकण, नाशिक, पुणे व इतर परिसरातून सुमारे ८०० विद्यार्थी व पालकउपस्थित होते.



कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून मुंबईच्या निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त सौ. रेहाना शेख उपस्थितहोत्या, तर डॉ. मुनीर सय्यद, सहाय्यक उपाध्यक्ष, जिओ यांनी मान्यवर पाहुणे म्हणून उपस्थिती लावली.यावेळी डॉ. के. पी. शरीफ (व्यवस्थापकीय संचालक, फर्नोव्हा पॉलिमर लिमिटेड),, बुरहान हॅरिस(चेअरमन, बी.आय.एन.एम.), इक्बाल कवारे (बोर्ड सदस्य, अंजुमन–ए–इस्लाम), ऐनुल अत्तार(संचालक, शिक्षण, अंजुमन–ए–इस्लाम), डॉ. शफी पठाण (प्राचार्य, एम. एच. साबू सिद्दीक कॉलेज ऑफइंजिनिअरिंग), डॉ. ए. के. कुरेशी (प्राचार्य, एम. एच. साबू सिद्दीक पॉलिटेक्निक), डॉ. रमजान ए. खाटीक(संचालक, अंजुमन–ए–इस्लाम्स कालसेकर टेक्निकल कॅम्पस), डॉ. राजेंद्र मगर (डीन, स्कूल ऑफइंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी), डॉ. शारीक सय्यद (डीन, स्कूल ऑफ फार्मसी), प्रा. राज म्हात्रे (डीन, स्कूलऑफ आर्किटेक्चर), प्रा. आरिफ शेख (प्राचार्य, अंजुमन–ए–इस्लाम्स अब्दुल रझाक कालसेकर पॉलिटेक्निक),डॉ. आसिया रेडिओवाला (प्राचार्य, होम सायन्स कॉलेज) तसेच सौ. जुलेखा सिद्दीकी (प्राचार्या, अंजुमन–ए–इस्लाम ए. ए. के. इंग्लिश हायस्कूल, वाशी) यांची विशेष उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनीविद्यार्थ्यांना शिक्षण, करिअर नियोजन आणि उज्ज्वल भविष्यासंदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले.

या प्रसंगी एसएससी, एचएससी, आयटीआय आणि डिप्लोमा शाखांतील २०० हून अधिक गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे १५ हून अधिक महाविद्यालयांनी माहिती व मार्गदर्शन स्टॉल्स उभारले होते. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. झहीर आय. काझी (PadmaAwardee २०२४), अध्यक्ष, अंजुमन–ए–इस्लाम आणि यांचे दूरदर्शी नेतृत्व व मार्गदर्शन लाभले. तसेचअंजुमन–ए–इस्लामच्या सर्व व्यवस्थापन सदस्यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

## पनवेलमध्ये आढळला अनोळखी महिलेचा मृतदेह

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अनोळखी महिलेचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. सदर महिलेस उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला असल्याची माहिती पोलिसांनी दिली.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही महिला बेशुद्ध अवस्थेत आढळून आली होती. तिचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे असून ती सावळ्या वर्णाची आहे. अंगात फिकट रंगाची साडी व ब्लाऊज परिधान केलेले होते. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मृत महिलेची ओळख अद्याप पटलेली नसून तिच्या नातेवाईकांचा अथवा परिचितांचा शोध सुरू आहे. सदर महिलेबाबत कोणाला काही माहिती असल्यास त्यांनी तात्काळ पनवेल शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी नागरिकांनी अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे मो.नं.८५९१४२४३५० किंवा पोउपनि. अनंत परागे मो.नं.८७७९६५९५०८ येथे संपर्क साधावा.

# चांभार्लीत घंटागाडीचे लोकार्पण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आमदार महेश बालदी यांच्या आमदार निधीतून तसेच सरपंच प्रतिप पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून ग्रुप ग्रामपंचायत चांभार्लीस घंटागाडी उपलब्ध करून देण्यात आली.या घंटागाडीचे लोकार्पण सभापती कृष्णा पारंगे, सरपंच प्रतिप पाटील व पंचायत समिती सदस्या अर्चना भोईर यांच्याहस्ते करण्यात आले.

यावेळी ग्रामपंचायत सदस्या बेबी कृष्णा गोंधळी, सदस्या प्रियंका प्रतिप पाटील, ग्रामपंचायत अधिकारी सीमा राठोड ,डॉ संजय कुरंगळे, कैलास अनंत म्हात्रे, दत्तात्रेय लक्ष्मण जांभळे (माजी पंचायत समिती अध्यक्ष भाजपा), वृशाली कैलास म्हात्रे, निखिल भोईर आदी उपस्थित होते.

चांभार्ली ग्रामपंचायतीला घंटागाडी मिळाल्याने परिसरातील टाकाऊ कचरा संकलित करणे सोयीचे होईल.चांभार्ली ग्रामपंचायतीला सामाजिक दृष्ट्या सुरक्षित गाव म्हणून देशात दुसरा क्रमांक आल्याने ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकही प्रथम स्वच्छतेला अधिक महत्त्व देतात.ग्रामपंचायतीला घंटागाडी मिळाल्याने परिसरातील नागरिकांनी आमदार महेश बालदी यांचे आभार मानले.



# ओएटिकर इंडियाचे मोफत आरोग्य शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

ओएटिकर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, समहिता आणि स्फेरुल फाऊंडेशन संस्था, यांच्या संयुक्त विद्यमाने रसायनी तील तुराडे येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये सुमारे ६०० ग्रामस्थांनी मोफत आरोग्य तपासणी, तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला आणि आवश्यक औषधोपचाराचा लाभ घेतला.

या शिबिरात गर्भवती व स्तनदा माता, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि इतर ग्रामस्थांची आरोग्य तपासणी करून आवश्यक निदान व पुढील उपचारांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. नियमित आरोग्यसेवा सहज उपलब्ध नसलेल्या नागरिकांसाठी हा उपक्रम विशेषतः उपयुक्त ठरला.



# आशा सचदेव सत्तरीत, चित्रपटसृष्टीत पन्नाशी





आजच्या मल्टीप्लेक्स युगातील जेन झी पिढीला हिंदी चित्रपटसृष्टीतील आशा सचदेव नावाची अभिनेत्री माहीत असण्याची शक्यता कमी आहे आणि आपण लक्षात रहावे, असावे अशीही लक्षवेधक कामगिरी जवळपास दीडशे चित्रपट आणि काही मालिकांमध्ये काम करुनही आशा सचदेवला साध्य करता आले नाही. असेही एखाद्या कलाकाराचे प्रगती पुस्तक असू शकते. कधी कधी एकूणच स्पर्धेत आपण टिच्चून टिकून राहण्यासाठी मिळेल ती भूमिका साकारत साकारत वाटचाल करावी लागते. आशा सचदेव (जन्म २७ मे १९५६) नुकतीच सत्तर वर्षांची झाली आणि त्यातील पन्नास बावन्न वर्षे चित्रपटसृष्टीतील आहेत हे विशेष.

आशा सचदेव म्हणजे आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीसमोरची हिंदी चित्रपटसृष्टीतील जणू राशी खन्ना, तृप्ती डिमरी, सोनम बजवा अथवा तमन्ना भाटिया. कातिल अदा ही त्यांची जणू खासियत.

अभिनयाच्या वाटेला गेलो न गेलो तरी अडत नाही. घडत नाही. आधुनिक फॅशनच्या स्टाईलीश वस्त्रात आपल्या सौंदर्याचे आकर्षक दर्शन घडवणे या एका पासपोर्टवर रुपेरी पडद्यावर, गॉसिप्स मॅगझिनमधून, फिल्मी पार्टीतून, फिल्मी इव्हेंटसमधून ' दिसत ' राहणे हेच या वर्गातील अभिनेत्रींचे हुकमी काम. आज सोशल मीडियात त्यांना इन्फूअन्सर्स भरपूर स्कोप देतात, त्या विमानतळावर आल्या आल्या, गेल्या गेल्या, कुठे मॉलमध्ये असल्या की त्या बाहेर पडण्यापूर्वीच रिल पोस्ट करणे. इतकीच त्यांची झेप.

प्रत्येक दशकात हिंदी चित्रपटसृष्टीत आशा सचदेव, पद्मिनी कपिला, शीतल, श्यामली, प्रेमा नारायण, जाहिरा वगैरे असतात आणि असल्या तरी त्या नसतात. त्याना पीन अप गर्ल, सेन्ट्रल पेज आयटेम गर्ल, शो बिझनेस गर्ल असेही म्हणतात. काही काळाने त्या पडद्याआड जातात, तशाच वैशिष्ट्यांच्या आणखी कोणी येतात आणि हे चक्र सुरू राहते. आणि यातील अनेक 'उडत्या तबकड्या' नक्की कुठे जातात, हरवतात हे समजत नाही.

आशा सचदेवही साधारण पंधरा वीस वर्षांपासून चित्रपटसृष्टीपासून दूर आहे आणि तिला या चकाचक क्षेत्रापासून शक्य तितके लांब राहून आपलं आयुष्य जगणं जमलं आहे आणि याचे श्रेय तिला द्यायला हवे. जवळपास तीस वर्षे आपण ज्या क्षेत्रात वावरलो, दिग्दर्शकाकडून झालेले सायलेन्स.... लाइट्स, कॅमेरा, ॲक्शन असे म्हणणे ऐकले, ती सवय मोडणे सोपे नसते.

आशा सचदेव हिने पुणे येथील चित्रपट आणि दूरदर्शन अभिनय संस्था (फिल्म ॲन्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया) येथे अभिनय प्रशिक्षण घेतले. पण तेथे अभिनयाचा श्रीगणेशा केलेले सगळेच कलाकार जया भादुरी होत नाहीत, कोणी राधा सलुजाही होते. आशा सचदेव जया भादुरी, डॅनी डेन्झोपा, असरानी यांच्या नंतरच्या बॅचची. अभिनय प्रशिक्षण घेतले तरी प्रत्यक्षात चित्रपटसृष्टीत पाऊल टाकल्यावर कोणत्या बॅनरचे चित्रपट मिळताहेत, त्याचे स्वरुप काय आहे या गोष्टीही महत्त्वाच्या असतात. आशा सचदेवला जोगिंदर अभिनित व दिग्दर्शित ' बिदीया और बंदूक '(१९७२. नायक किरणकुमार) आणि कुकू कोहली दिग्दर्शित " डबल क्रॉस '(१९७३) हे चित्रपट मिळाले. बिदीया और बंदूक हा तसा बी ग्रेड मसालेदार मनोरंजक चित्रपट. त्यात आशा सचदेवने दुर्गा ही ग्रामीण भागातील युवती साकारताना तिच्या अभिनयापेक्षा तिचं ओलेती रुप, तिचं धाडसी वावरणे याला स्कोप होता. डबल क्रॉस या चित्रपटात विजय आनंदची दुहेरी भूमिका. आणि अर्थातच दोन नायिका. रेखा आणि आशा सचदेव. दोन्ही ग्लॅमरस लूकमध्ये. बिदीया और बंदूक गल्ला पेटीवर यशस्वी ठरला, डबल क्रॉसला रसिकांनी नाकारले. आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीला अशी यशापयशाची खेळी झाल्याने आशा सचदेवला चित्रपट निवडीसाठी वाव मिळाला नाही, जे आणि जसे चित्रपट आले, तसे ते स्वीकारावे लागले. आशा सचदेवने कारकीर्द सुरू केली तेव्हा अगोदरच्या पिढीतील शर्मिला टागोर, तनुजा, सायरा बानू कार्यरत होत्या, हेमा मालिनी, राखी, जया भादुरी, रेखा आघाडीवर होत्या. झीनत अमान, परवीन बॉबी या पाश्चात्य वळणाच्या अभिनेत्री लक्षवेधक ठरत होत्या. नीतू सिंग, रिना रॉय, मौशमी चटर्जी, योगिता बाली यांचा झंझावात सुरू झाला होता. वेगळ्या प्रवाहातील चित्रपटातून शबाना आझमी फोकसमध्ये होती. सुलक्षणा पंडित, विद्या सिन्हा , रेहाना सुल्तान, नाझनीन, जाहिरा अशा अनेक अभिनेत्री होत्याच. आशा सचदेवसमोर मोठेच आव्हान होते. राजेश खन्नाच्या झंझावातात ती आली पण त्याची ती नायिका होऊ शकत नव्हती. अमिताभ बच्चनचे युग संचारले, तेथेही आशा सचदेवला स्कोप नाही. अशा वेळी बी ग्रेड सिनेमांमध्ये काम करा किंवा ए ग्रेड सिनेमांमध्ये सहाय्यक भूमिका करा हाच पर्याय राहतो आणि उरलेली कसर गॉसिप्स मॅगझिनमधून बिनधास्त फोटो सेशन करा.

आशा सचदेव या चौकटीत जणू अडकली. हाथी के दात (त्या काळात अवघ्या चार दिवसांत हा चित्रपट आमच्या गिरगावातील सेन्ट्रल थिएटरमधून उतरला. चित्रपट फ्लॉपचा रेकॉर्ड), हिफाजत, एक नारी दो रुप, कश्मकश, दो चट्टाने, दो नंबर के अमिर, एक ही रास्ता, एजण्ड विनोद, शाही लुटेरा, हमराही , आहुती, वो मै नहीं,भूख, ज्वाला डाकू, प्यार की मंजिल, सुहाग, मामा भाजा, हमसे ना जिता कोई, हसते खेलते, प्यार के काबिल, सत्ते पे सत्ता.... अशा अनेक चित्रपटांतून भूमिका केल्या. त्यातून एकच घडले, आशा सचदेव कार्यरत राहिली. अधिकचे काही गुण मिळाले असे काहीही घडलं नाही. एखाद्या (खरंतर अनेक) कलाकाराची कारकीर्द अशीही असू शकते. एकामागोमाग एक चित्रपट मिळत जातात, वाटेला आलेली भूमिका साकारत जायचे इतकेच. सुरुवातच बी ग्रेड चित्रपटात काम करुन केल्याने पुढचं सगळं गणितच विस्कटले असा एक निष्कर्ष निघतो. पण आशा सचदेवकडे आकर्षक सौंदर्य, ते पडद्यावर आणि फोटो सेशनमध्ये मांडण्याचा धीटपणा याशिवाय काय होते? बासू चटर्जी दिग्दर्शित ' प्रियतमा ' या खेळकर खोडकर चित्रपटात तिला नीतू सिंगची मैत्रीण रेणू ही एक दिलखुलास भूमिका मिळाली आणि तिने चक्क चष्मा लावून ती भूमिका रंगवली, खुलवली. तिला त्या भूमिकेसाठी फिल्म फेअर पुरस्कार प्राप्त झाला.

तिने पडद्यावर अनेक गाण्यांवर काम केले.सत्ते पे सत्ता या चित्रपटातील मौसम मस्ताना या गाण्यात तीदेखील आहे.तरी दोन गाणी विशेष उल्लेखनीय, एक म्हणजे बी. आर. चोप्रा दिग्दर्शित ' द बर्निंग ट्रेन ' मधील धावत्या ट्रेनमधील पल दो पल का साथ हमारा ही कव्वाली आणि राज कपूर दिग्दर्शित ' प्रेम रोग ' या चित्रपटातील यह प्यार था या कुछ और था हे गाणे. दोन मान्यवर दिग्दर्शकांचे तिला हे विशेष देणे. ही तिची खरी मिळकत.

कालांतराने आशा सचदेवची चित्रपटसृष्टीला फारशी गरज नव्हती जणू. कारण पुढील पिढीतील ग्लॅमरस लूक असलेल्या अभिनेत्री आल्या होत्या. आशा सचदेवने फिजा, आगाज, आजा नचले, झूम बराबर झूम अशा काही चित्रपटांत तसेच बुनियाद वगैरे काही मालिकांमध्ये काम केले. पण आता तिच्यासाठी यात फक्त आणि फक्त मनोरंजन क्षेत्रात कार्यरत आहोत हे दाखवून द्यायचे होते. नंतर त्याचीही तिला आवश्यकता वाटली नाही. आगाज या चित्रपटाच्या कमालिस्तान स्टुडिओतील सेटवर आशा सचदेवच्या मुलाखतीचा योग आला असता आपणास या क्षेत्रात टिकून राहण्यासाठी येईल तो चित्रपट स्वीकारणे हा एकच पर्याय होता आणि तो मी एन्जॉय केला, नायिकेच्या भूमिकेसाठी आश्वासनं अनेक मिळाली पण ती त्या चित्रपटाच्या घोषणेवरच राहिली असे तिने म्हटले. उद्योगपती किशनलाल यांच्याशी तिचा प्रेम विवाह नक्की झाला होता पण दुर्दैवाने त्यांचे अपघाती निधन झाले आणि आशा सचदेवने कधीच लग्न न करण्याचा निर्णय घेतला आणि तो कायम ठेवला.

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

आशा सचदेवचे मूळ नाव नफिसा सुल्तान. ती आशा सचदेव कशी झाली? अहमद अली खान हे तिचे वडील. त्यांना दोन मुली व एक मुलगा. पण साठच्या दशकाच्या सुरुवातीला त्यांचा घटस्फोट झाला तेव्हा मुलगा वडिलांकडे तर दोन्ही मुली आई रझियाकडे असा निर्णय घेतला गेला. आईने आता वकील आय. पी. सचदेव यांच्याशी लग्न केले आणि नफिसा सुल्तान हिचे नाव आशा सचदेव झाले. बहिणीचे नाव रेश्मा सचदेव झाले. तर यांच्या वडिलांनी दुसरं लग्न केले, त्यातील मुलगा अर्शद वारसी. तर आशा सचदेवचा भाऊ म्हणजे पार्श्वगायक अन्वर हुसेन अशी ही नात्यातील गोष्ट. आपली आई हिंदी चित्रपटातून लहान मोठ्या भूमिका साकारत आहे म्हणून आपणही चित्रपटात काम करावे अशी आशा सचदेवची इच्छा होती ती पूर्ण झाली इतकेच....

आशा सचदेवला राम केळकर यांनी आपल्या दिग्दर्शनातील ' प्यासी आँखें '(१९८४) या चित्रपटात वहिदा रेहमान, शबाना आझमी आणि अमोल पालेकर यांच्यासह संधी दिली. दुर्दैवाने हा चित्रपट बराच काळ निर्मितीवस्थेत रखडला. विशेष उल्लेखनीय गोष्ट हा चित्रपट राजा ठाकूर दिग्दर्शित ' एकटी '(१९६८) या मराठी चित्रपटाची रिमेक आहे. या चित्रपटाची पटकथा आणि संवाद राम केळकर यांनी लिहिलेले आहेत आणि या चित्रपटात सुलोचना, डॉ. काशिनाथ घाणेकर, इंदुमती पैगणकर, शरद तळवलकर, कुसुम देशपांडे इत्यादींच्या प्रमुख भूमिका आहेत. आशा सचदेवने फार पूर्वी शबाना आझमीसोबत आपली एकेकाळी चांगली मैत्री होती, पण आपण चित्रपटसृष्टीत शोभेच्या भूमिका साकारत असलेली अभिनेत्री म्हणून ओळखल्या जात असल्याने तिने आणि इतरांनीही आपली साथ सोडली आणि आपण 'एकटी' राहिलो, असं म्हटलं होतं.

# महाकर्जमुक्तीचा ऐतिहासिक निर्णय

शेतकरी राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत. अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी व महापूर यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच त्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊन कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६ जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

अहिल्यादेवी कुशल प्रशासक होत्या. शेती, सिंचन, जलसंधारण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही आदर्श मानले जाते. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना न्याय देण्याची त्यांची भूमिका होती. म्हणूनच त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाशी निगडित या महत्त्वपूर्ण योजनेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना हे नाव देऊन शासनाने त्यांच्या कार्याला अभिवादन केले आहे.

शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी राज्य शासनाने यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ आणि महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना २०२२ जाहीर करुन शेतकऱ्यांना वेळोवेळी भरीव मदत केली आहे.

राज्यातील शेतकरी कर्जमुक्तीनंतरही थकीत कर्जाच्या दुष्टचक्रामध्ये अडकत असल्याचे दिसून येते. शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरुपी सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता म्हणून यादृष्टीने शिफारशी करण्यासाठी मुख्यमंत्री यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (मित्र) प्रविण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत केली होती.

या समितीने शेतकऱ्यांना कर्जमुक्तीची आवश्यकता, शेतकऱ्यांवर वारंवार कर्जमाफीची वेळ का येते? त्यांच्या उत्पन्नात स्थैर्य का निर्माण होत नाही? भविष्यात शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात अडकू नयेत, शेतकरी सक्षम व्हावा याबाबत अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा दोन्ही प्रकारच्या उपाययोजना सुचविलेल्या आहेत. मात्र तातडीचा दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

**कर्जमुक्ती योजना काय आहे?**

२०१७मध्ये दीड लाख रुपयांपर्यंत, तर २०१९मध्ये दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात आली होती. यावेळीही दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती देण्यात येत आहे. अल्पमुदतीची थकीत पीककर्जे, तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जाचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे.

यावेळी एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे आणि तो म्हणजे पूर्वी दोन लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा थोडी जास्त रक्कम कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता, म्हणजे एकाद्या शेतकऱ्याचे दोन लाख दहा हजार कर्ज असेल तर तो शेतकरी अपात्र होता. आता मात्र अशा शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम शासन भरणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे. तसेच यामध्ये जमीन धारणेची अट नाही.

याशिवाय नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. कर्जफेडीची शिस्त टिकवून ठेवण्यासाठी आणि प्रामाणिक कर्जदारांना प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

**एकवेळ समझोता योजना**



१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२६अखेर उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जखात्यांची एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्ज खात्यांची मुद्दल व व्याजासह ३० सप्टेंबर २०२५अखेर थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६पर्यंत परतफेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त असेल अशा शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील रक्कम भरल्यानंतर त्यांना लाभ मिळणार आहे. त्यामुळे प्रत्यक्षात शेतकऱ्यांना जी थकित रक्कम आहे त्यापेक्षा कमी रक्कम भरावी लागेल. विशेष म्हणजे अशा शेतकऱ्यांना त्यांच्या हिश्श्याची दोन लाखांवरील थकित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७पर्यंत कालावधी दिला जाणार आहे.

**प्रोत्साहनपर लाभ**

नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या योजनेअंतर्गत २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५पैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन ३० जूनपूर्वी किंवा बँकेच्या नियमानुसार विहित वेळेत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति शेतकरी रु. ५० हजारपर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. यासाठी २०२५-२६ व २०२६-२७ या आर्थिक वर्षांतील अल्पमुदत पीक कर्जाचीही वेळेत परतफेड करणे आवश्यक राहील.

२०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात पूर्णतः परतफेड केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची रक्कम ५० हजारांपेक्षा कमी असल्यास अशा शेतकऱ्यांना त्यांनी २०२३-२४ अथवा २०२४-२५ या वर्षात अल्प मुदत पीक कर्जाच्या मुद्दल व व्याजासह प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम किंवा पाच हजार प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.

**नियमित परतफेड करणाऱ्यांना मोठा दिलासा**

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९मधील योजनेच्या लाभार्थ्यांसाठी महत्वाची तरतूद यामध्ये करण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५पर्यंत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचे केलेले पुर्नगठन/फेरपुर्नगठन थकीत हप्त्याची ३० सप्टेंबर २०२५पर्यंत रक्कम रु. ५० हजार पर्यंत असल्यास पूर्ण कर्जमुक्ती आणि रु.५० हजारांपेक्षा जास्त असल्यास एकवेळ समझोता (OTS) योजनेचा लाभ मिळणार आणि रक्कम भरण्याची मुदत ३१ मार्च २०२७ असणार आहे.

**योजनेचे निकष**

पात्र शेतकऱ्यांना मुद्दल आणि व्याजासह प्रति शेतकरी दोन लाख रुपयांपर्यंत थेट कर्जमुक्ती.

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जासाठी लागू.

३० सप्टेंबर २०२५अखेर थकीत असलेल्या कर्जाचा समावेश.

३१ मार्च २०२६पर्यंत परतफेड न झालेल्या कर्जाचा समावेश.

जमीन धारणेची अट नाही.

पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात पुनर्गठन/फेरपुनर्गठन केलेल्या थकीत हप्त्यांनाही दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती.

दोन लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असल्यास अतिरिक्त रक्कम ३१ मार्च २०२७पर्यंत संबंधित बँकेत जमा केल्यास कर्जमुक्तीचा लाभ.

शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करणे अनिवार्य आहे.

राष्ट्रीयकृत, खाजगी, ग्रामीण, जिल्हा बँका व प्रा. कृषी पतपुरवठा संस्थांच्या कर्जाना लागू.

**कोण पात्र असणार नाहीत?**

विद्यमान किंवा माजी मंत्री, राज्यमंत्री, लोकसभा व राज्यसभा सदस्य, विधानसभा व विधान परिषद सदस्य तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतील (महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायतीचे विद्यमान किंवा माजी सदस्य.

केंद्र किंवा राज्य शासनातील असे अधिकारी व कर्मचारी, ज्यांचे एकत्रित मासिक वेतन रु.२५ हजारपेक्षा अधिक आहे.

राज्य सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (उदा. महावितरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ), अनुदानित संस्थांतील रु. २५ हजारपेक्षा अधिक मासिक वेतन असलेले अधिकारी व कर्मचारी.

शेतीव्यतिरिक्तच्या उत्पन्नावर आयकर भरणाऱ्या व्यक्ती

निवृत्तीवेतनधारक व्यक्ती ज्यांचे २५ हजारपेक्षा अधिक

दरम्यान, मासिक निवृत्तीवेतन घेणारे निवृत्तीवेतनधारक (मात्र माजी सैनिकांना हा अपवाद लागू राहील).

कृषी उत्पन्न बाजार समित्या, सहकारी साखर कारखाने, सहकारी सुतगिरण्या, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड तसेच सहकारी दूध संघ यातील अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळाचे सदस्य, अधिकारी व रु. २५ हजारपेक्षा अधिक एकत्रित वेतन असलेले कर्मचारी, मात्र सहकारी साखर कारखान्यांतील हंगामी कामगार या अपात्रतेतून वगळण्यात आले असून ते योजनेसाठी पात्र राहतील.

या कर्जमुक्ती योजनेची संपूर्ण अंमलबजावणी प्रक्रिया ऑनलाईन आणि पारदर्शक असून या योजनेचा लाभ सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार आहे.

**-काशीबाई थोरात,**
**विभागीय संपर्क अधिकारी**

# स्मिता पाटील : अधुरी एक कहाणी

मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीला आपल्या सहजसुंदर अभिनयाने भारून टाकणारी, स्त्रीप्रधान भूमिकांना नवा आयाम देणारी अभिनेत्री स्मिता पाटील यांची कहाणी खऱ्या अर्थाने 'अधुरी' राहिली. अवघ्या ३१ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी भारतीय सिनेमावर अमीट ठसा उमटवला. १७ ऑक्टोबर १९५६ रोजी पुण्यात जन्मलेल्या स्मिताचा प्रवास पुण्याच्या फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूटपासून सुरू झाला आणि थेट जागतिक चित्रपट महोत्सवांपर्यंत पोहोचला. मात्र १३ डिसेंबर १९८६ रोजी प्रसूतीपश्चात गुंतागुंतीमुळे त्यांचे अकाली निधन झाले आणि भारतीय सिनेमा एका तेजस्वी ताऱ्याला मुकला.



पुण्यातून सुरू झालेला प्रवास स्मिता पाटील यांचे वडील शिवाजीराव पाटील हे महाराष्ट्रातील नामवंत राजकारणी, तर आई विद्याताई पाटील या समाजसेविका. घरातूनच सामाजिक भान आणि संवेदनशीलता स्मिताला मिळाली. पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातून पदवी घेतल्यानंतर त्यांनी दूरदर्शनवर बातमी निवेदिका म्हणून काम सुरू केले. त्यांचा आत्मविश्वासपूर्ण चेहरा आणि स्पष्ट वाणीने त्यांना वेगळी ओळख मिळवून दिली. याच काळात श्याम बेनेगल यांची नजर त्यांच्यावर पडली आणि 'चरणदास चोर' या चित्रपटातून स्मिताने सिनेसृष्टीत पाऊल ठेवले.समांतर सिनेमाची राणी १९७० आणि ८० चे दशक हा भारतीय समांतर सिनेमाचा सुवर्णकाळ मानला जातो. श्याम बेनेगल, गोविंद निहलानी, केतन मेहता, मृणाल सेन यांसारख्या दिग्दर्शकांनी वास्तववादी विषय हाताळले आणि त्यासाठी स्मिता पाटील हा पहिला पर्याय ठरली.

'मंथन', 'भूमिका', 'आक्रोश', 'चक्र', 'मंडी', 'अर्थ', 'बाजार' या चित्रपटांमधून तिने ग्रामीण स्त्री, शोषित कामगार, दलित महिला, तमाशा कलावंत अशा विविध स्तरांतील स्त्रियांच्या वेदना पडद्यावर जिवंत केल्या. 'भूमिका'साठी तिला पहिला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. तिच्या डोळ्यातील करुणा आणि चेहऱ्यावरील निरागसता प्रेक्षकांच्या थेट काळजाला भिडत असे.स्मिता केवळ समांतर सिनेमापुरती मर्यादित राहिली नाही. व्यावसायिक चित्रपटांतही तिने 'नमक हलाल', 'शक्ती', 'आखिर क्यों?' यांसारख्या चित्रपटांमधून आपली वेगळी छाप सोडली. अमिताभ बच्चन, राज बब्बर, नसीरुद्दीन शाह यांसारख्या दिग्गज कलाकारांसोबत काम करताना तिने कधीही आपले वेगळेपण हरवू दिले नाही. कॅमेऱ्यासमोर ती भूमिका जगत असे, अभिनय करत नव्हती.मराठी मातीशी नाळ स्मिता पाटील यांचे मराठी सिनेमावरील प्रेमही तितकेच उत्कट होते. 'जैत रे जैत', 'उंबरठा', 'सामना' या चित्रपटांमधून तिने मराठी प्रेक्षकांच्या मनात घर केले. डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित 'उंबरठा'मधील सुलभा महाजन ही स्त्रीवादी कार्यकर्ती तिने इतकी समरसून साकारली की आजही ती भूमिका मराठी सिनेमातील मैलाचा दगड मानली जाते. ग्रामीण महाराष्ट्रातील स्त्रीच्या प्रश्नांना वाचा फोडणारी स्मिता स्वतःही सामाजिक कार्यात सक्रिय होती.

महिला सबलीकरण केंद्रांना ती भेटी देत असे, त्यांचे प्रश्न समजून घेत असे.वैयक्तिक आयुष्य आणि अकाली एक्झिट अभिनेते राज बब्बर यांच्याशी विवाह आणि त्यानंतर मुलगा प्रतीक बब्बरचा जन्म हा तिच्या आयुष्यातील आनंदाचा क्षण ठरला. मात्र २८ नोव्हेंबर १९८६ रोजी प्रतीकच्या जन्मानंतर अवघ्या १५ दिवसांत, १३ डिसेंबर १९८६ रोजी प्रसूतीपश्चात आलेल्या गुंतागुंतीमुळे स्मिताने जगाचा निरोप घेतला. अवघ्या १० वर्षांच्या कारकिर्दीत तिने ८० हून अधिक चित्रपट केले. दोन राष्ट्रीय पुरस्कार, एक फिल्मफेअर पुरस्कार आणि पद्मश्री हा सन्मान तिला मिळाला. अधुरी राहिलेली स्वप्ने स्मिता पाटील यांना अजून खूप काही करायचे होते. त्या काळात त्या जागतिक सिनेमाकडे वळत होत्या. फ्रेंच दिग्दर्शक कोस्टा गॅवरास यांच्या चित्रपटात काम करण्याची संधी त्यांना मिळाली होती. स्त्रीवादी चळवळीत अधिक सक्रिय होण्याची, ग्रामीण महिलांसाठी काही ठोस करण्याची तिची इच्छा होती. तिच्या डायरीत नोंदवलेले विचार आजही अनेकांना प्रेरणा देतात. (साभार इंटरनेट)

# रेवदंडा आगरकोट किल्ल्याच्या 'वन बुरुज'ला नवजीवन

## ◆ पुरातत्त्व विभागाकडून ऐतिहासिक वारसा जपण्याचा स्तुत्य उपक्रम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा आगरकोट किल्ल्याच्या उत्तर प्रवेशद्वार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ऐतिहासिक 'वन बुरुज'च्या संवर्धनासाठी केंद्रीय पुरातत्त्व विभागाने हाती घेतलेले डागडुजी व दुरुस्तीचे काम सध्या वेगाने सुरू असून, जीर्ण अवस्थेत पोहोचलेल्या या ऐतिहासिक वास्तूला नवसंजीवनी मिळत आहे. शास्त्रोक्त पद्धतीने सुरू असलेल्या या कामामुळे रेवदंड्याच्या समृद्ध ऐतिहासिक वारशाचे जतन होण्यास मोठी मदत होणार आहे.



१६व्या शतकात पोर्तुगीजांनी उभारलेल्या आगरकोट किल्ल्याच्या या भव्य प्रवेशद्वाराने अनेक ऐतिहासिक घडामोडींची साक्ष दिली आहे. कालांतराने पावसाचा मारा, झाडांची वाढ आणि नैसर्गिक झीज यामुळे प्रवेशद्वारावरील दगडी बांधकाम, पोर्तुगीज सत्तेचे प्रतीक असलेले क्राऊन शिल्प, तसेच शेजारील कोरीव भाग मोठ्या प्रमाणात जीर्ण झाला होता. त्यामुळे या वास्तूच्या तातडीच्या संवर्धनाची आवश्यकता निर्माण झाली होती. रेवदंडा संरक्षण सहाय्यक बजरंग येळीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर केंद्रीय पुरातत्त्व विभागाच्या मुंबई मंडळाचे अधीक्षक डॉ. अभिजित आंबेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे संवर्धन कार्य हाती घेण्यात आले आहे. सध्या बांबूच्या माचांद्वारे अत्यंत काळजीपूर्वक दगडी बांधकाम मजबूत करण्याचे काम सुरू असून, मूळ स्थापत्याची ऐतिहासिक ओळख आणि वैशिष्ट्ये अबाधित राहतील याची विशेष खबरदारी घेतली जात आहे.

संवर्धनाच्या कामात प्रवेशद्वारावरील पोर्तुगीज क्राऊन शिल्प, दगडी कमान, तटबंदी, शिलालेख आणि कोरीव स्थापत्य घटकांचे संरक्षण करण्यास प्राधान्य दिले जात आहे. पारंपरिक बांधकाम तंत्र आणि पुरातत्त्वीय निकषांचा अवलंब करून हे काम करण्यात येत असल्याने संवर्धनानंतर वास्तूचे मूळ स्वरूप कायम राहणार आहे.

इतिहास अभ्यासकांच्या मते, किल्ल्याचे प्रवेशद्वार हे केवळ दगडी बांधकाम नसून तत्कालीन लष्करी रणनीती, स्थापत्यकला आणि सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक आहेत. त्यामुळे अशा ऐतिहासिक वारशाचे जतन करणे ही काळाची गरज असून, केंद्रीय पुरातत्त्व विभागाचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद ठरत आहे.

संवर्धन कामानंतर रेवदंडा आगरकोट किल्ल्याचा 'वन बुरुज' इतिहासप्रेमी आणि संशोधकांसाठी प्रमुख आकर्षण ठरणार असून रेवदंड्याच्या ऐतिहासिक ओळखीला नवे बळ मिळणार आहे.

# मुरूडचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांना पदोन्नती

**मुरूड : प्रतिनिधी**



मुरुड जंजिरा नगर परिषदेचे कार्यक्षम, अभ्यासू आणि विकासाभिमुख मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांची गट-अ मुख्याधिकारी तथा उपआयुक्त (महानगरपालिका) या पदावर पदोन्नती झाल्याने प्रशासकीय क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. आपल्या व्यापक ज्ञान, प्रगल्भ विचारसरणी, सखोल दृष्टिकोन आणि परिणामकारक प्रशासकीय कार्यपद्धतीच्या बळावर त्यांनी ही उल्लेखनीय कामगिरी प्राप्त केली आहे.

बच्छाव हे कोणत्याही विषयाचा सर्वंकष अभ्यास करून तर्कशुद्ध आणि दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेणारे अधिकारी म्हणून ओळखले जातात. प्रशासकीय शिस्त, पारदर्शक प्रशासन आणि विकासाला प्राधान्य देणारी त्यांची कार्यशैली ही त्यांची विशेष ओळख आहे. त्यामुळे त्यांनी ज्या-ज्या ठिकाणी जबाबदारी सांभाळली, तेथे प्रशासनाला नवी दिशा आणि गती प्राप्त करून दिली आहे .

मुख्याधिकारी बच्छाव यांच्या नेतृत्वाखाली मुरुड शहराच्या विकासाला नवे परिमाण प्राप्त झाले. शहरातील रस्ते, गटारे, पावसाळी जलनिस्सारण व्यवस्था आदी कामे पूर्ण करण्यात आली.

# माणगावमधील तेटगुरे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते उद्घाटन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील तेटगुरे मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलमधून गोरगरीब रुग्णांना चांगल्या प्रकारे सेवा मिळावी हे हॉस्पिटल गरीब रुग्णांकरिता वरदान ठरून आपल्या हातून गरिबांची सेवा व्हावी, अशा शुभेच्छा राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी रुग्णालयाचे डॉ.संदेश तेटगुरे व तेटगुरे परिवाराला दिल्या. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांचे व नागरिकांचे धोंडू तेटगुरे,गणेश तेटगुरे,डॉ.संदेश तेटगुरे,डॉ.आदिक तेटगुरे यांच्यासह तेटगुरे परिवाराने स्वागत केले.



माणगाव येथे निजामपूर रोड मार्गावर तेटगुरे बिल्डींमध्ये उभारण्यात आलेल्या तेटगुरे मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचा उदघाटन सोहळा मंत्री भरत गोगावले यांच्याहस्ते शनिवार दि.२७ जून २०२६ रोजी सायंकाळी उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य प्रवक्ते अँड.राजीव साबळे,अतिरिक्त खाजगी सचिव केंद्रीय ग्रामविकास प्रकाश खोपकर,राष्ट्रवादीचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे,जिल्हा युवक राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष शादाब गैबी,माणगाव पंचायत समिती उपसभापती मनीषा मालोरे,माजी नगराध्यक्ष आनंद यादव,ज्ञानदेव पवार,राजिप सदस्य अस्लम राऊत,शिवसेनेचे तालुका प्रमुख अँड.महेंद्र माणकर,राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते गजानन अधिकारी,सामाजिक कार्यकर्ते रवींद्र मोरे,वैभव साबळे,अँड.अच्युत तोंडलेकर,अँड.भालचंद्र खाडे,जेष्ठ पत्रकार अरुण पवार,शिवसेनेचे शहर संपर्क प्रमुख अँड.प्रसाद धारिया,माजी जिल्हापरिषद सदस्य संदेश मालोरे,डॉ.परेश उभारे,पालघरचे गटविकास अधिकारी संजय भोये,सेवानिवृत्त गटविकास अधिकारी बी.एस.पुरी,सेवानिवृत्त विस्तार अधिकारी ढोले काका,डॉ.तेजस खोपकर,डॉ.विवेक अर्बन,विस्तार अधिकारी खालापूर शैलेश तांडेल,विस्तार अधिकारी जिल्हापरिषद अलिबाग श्री.भगत,सहाय्यक गटविकास अधिकारी जिल्हापरिषद अलिबाग श्री.देसाई,सेवानिवृत्त गटविकास अधिकारी मारुती चिणके,माजी सरपंच सखाराम जाधव,राजेंद्र शिर्के,प्रफुल खरंगटे आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी,शासकीय - निमशासकीय कार्यालयाचे अधिकारी,कर्मचारी,मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना मंत्री भरत गोगावले यांनी तेटगुरे कुटुंबियांना हे नवीन हॉस्पिटल माणगाव शहरात उभारल्याबद्दल सुरवातीलाच शुभेच्छा दिल्या. मंत्री गोगावले पुढे म्हणाले, तेटगुरे परिवार हे शून्यातून वर आले आहेत. त्यामुळे त्यांना गरिबीची जाणीव आहे.

# नागरी पतसंस्थांच्या संचालक व कर्मचाऱ्यांसाठी शिबिर

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मा. जिल्हा उपनिबंधक, रायगड-अलिबाग, कोकण विभाग नागरी सहकारी पतसंस्था संघ, अलिबाग आणि कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने संचालक व कर्मचारी वर्गासाठी आयोजित दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिरास चौल येथील वसुंधरा हॉटेल येथे उत्साहात प्रारंभ झाला.या प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटन समारंभास मा. श्री. संतोष घेराडे, सचिव, कोकण विभाग नागरी सहकारी पतसंस्था संघ, अलिबाग यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गिरीश तुळपुळे, अध्यक्ष, कोकण विभाग नागरी सहकारी पतसंस्था संघ, अलिबाग हे होते. तर नंदकुमार चाळके, अध्यक्ष, कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग यांची प्रमुख उपस्थिती लाभली. २७ व २८ जून रोजी आयोजित प्रशिक्षण शिबिरात कोकण विभागातील विविध नागरी सहकारी पतसंस्थांचे संचालक, व्यवस्थापक व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. रिझर्व्ह बँकेचे नियम, आर्थिक शिस्त, लेखापरीक्षण, जोखीम व्यवस्थापन, ग्राहक सेवा, माहिती तंत्रज्ञानाचा वापर तसेच बदलत्या आर्थिक परिस्थितीत नागरी पतसंस्थांची भूमिका या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात येत आहे.




## जाहिर नोटीस

सर्व व्यक्तीस / लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, नसरीन मोहम्मंद युनुस कुरेशी, रा. राम बच्चन चाळ, चाळ क्र.४०१, रुम क्र. ०६, कुर्ला (प), मुंबई-४०००७०, यांचे मौजे-हरिग्राम, ता. पनवेल, जि. रायगड, मालकी हक्क आणि ताबे-कब्जातील खालील वर्णनाची सदनिका ही आमचे अशिल श्री. राहूल राजेंद्र चौधरी, रा. नारायणवाडी, चाळीस गाव, जळगाव, महाराष्ट्र-४२४१०१, यांनी खरेदीखताने कायमस्वरुपी खरेदी करण्याचे योजिले आहे.

**सदनिकेचे वर्णन**
**मौजे-हरिग्राम, ता. पनवेल, जि.रायगड**

| सदनिका क्र./ मजला | बिल्डींग क्रमांक | बिल्डींगचे नाव | सर्व्हे क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| ३०५, तिसरा मजला | २ | ओर्चीड रेसिडेन्सी | १/६,१/१० आणि १/१२ | ३०.१९ चौ.मी. कारपेट ६.३३ चौ.मी. एफ.बी. एरिया |

वर नमूद सदनिकेस अनुसरून कुणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न-वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादीद्वारे मालकी अथवा इतर कसलाही हक्कहितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरूपासहित प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखल कराव्यात, सदर १५ दिवसांचे आत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर सदनिकेचे खरेदीखत/हस्तांतरण कायदेशिरपणे पूर्ण करतील व त्यानंतर मागावून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

**दिनांक : २७/०६/२०२६**
**ठिकाण : पनवेल**

**सही/-**
**अँड. शरद जाधव**
**संपकर्कासाठी पत्ता-कार्यालय क्र. ००१, तळमजला, रॉयल प्राईड, भुखंड क्र. ११३, एम.सी.सी.एच. सोसायटी, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, पिन-४१०२०६.**

# स्वर्गीय बाळासाहेबांचा विचार एकनाथ शिंदे यांनी सर्वसामान्यांपर्यंत पोहचवला -आमदार महेंद्र थोरवे

**खोपोली : प्रतिनिधी**

स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे विचार खऱ्या अर्थाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुढे नेले आहेत. अठरापगड जातींना सोबत घेऊन भाजप, राष्ट्रवादी व आरपीआय यांच्या मदतीने महाराष्ट्रात महायुतीचे सक्षम सरकार स्थापन झाले आहे, या सरकारने सर्वसामान्यांसाठी ज्या ज्या योजना कार्यान्वित केले आहेत त्या तळागाळापर्यंत पोचवण्याचे काम शिवसैनिकांनी करावे, असे आवाहन कर्जत खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे यांनी खोपोली येथे केले.



शिवसेनेला साठ वर्ष पूर्ण होत आहे या पार्श्वभूमीवर खोपोली शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार सोहळा व प्रवेश सोहळा महाराजा मंगल कार्यालयात गुरुवारी सायंकाळी आयोजित करण्यात आला होता यावेळी आमदार थोरवे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी व्यासपीठावर नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, गटनेते संदीप पाटील, जिल्हा परिषद सदस्य रेश्मा पाटील, कर्जत खालापूर महिला संपर्क प्रमुख कांचन जाधव, खोपोली शहर अध्यक्ष लक्ष्मण रिठे सह शहराचे पदाधिकारी व शिवसेना-भाजप युतीचे नगरसेवक नगरसेविका उपस्थित होत्या

प्रारंभी बाळासाहेब ठाकरे, आनंद दिघे, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस आमदार थोरवेंसह मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी बोलताना आमदार थोरवे यांनी शहराच्या विकासासाठी जास्तीत जास्त निधी देण्याचा प्रयत्न केला आहे म्हणून शहराच्या विविध प्रभागात विकासाची कामे सुरू आहेत हे सांगताना त्यांनी आमदार थोरवे यांचे मनापासून आभार मानले.

खालापूर पंचायत समितीचे उपसभापती भाई शिंदे यांनी मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी शिवसेनेचा मुंबईत जन्म झाला. खऱ्या अर्थाने स्वर्गीय बाळासाहेबांनी मराठी माणसाला हक्काचे व्यासपीठ व स्वाभिमानही दिला, असे सांगितले.

प्रारंभी खोपोली शहरप्रमुख लक्ष्मण रिठे यांनी शिवसेनेच्या साठ वर्षाच्या कालावधीचा इतिहास संक्षिप्तपणे सांगितला. यानंतर खोपोली शहरातील शैक्षणिक सामाजिक क्रीडा वैद्यकीय व पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांचा यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल आमदार थोरवे यांच्या हस्ते शाल व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. शिवसेना अंतर्गत काही कार्यकर्त्यांची नियुक्ती करण्यात आली.



मुरुड : परिसरातील कोळी बांधवांनी बोटी प्लास्टिकने बांधून सुरक्षित केल्या आहेत. सध्या मासेमारी बंद आहे. (छाया : सुधीर नाझरे)



# घणसोली-ऐरोली पुलाचे २५ टक्के काम पूर्ण; कामाला गती देण्याचे प्रयत्न

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

घणसोली-ऐरोली खाडीवरील पामबीच मार्ग विस्तार प्रकल्पाचे सुमारे २५ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम सुरू आहे. निधीचा प्रश्न कायम असला तरी काम थांबविण्यात आलेले नसून महापालिका स्वतःच्या आर्थिक नियोजनातून प्रकल्प पुढे नेत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. यापूर्वी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी प्रकल्पाची प्रत्यक्ष पाहणी करून रखडलेल्या कामाला गती देण्याचे निर्देश दिले होते. पावसाळ्यातही नियोजनबद्ध पद्धतीने काम सुरू ठेवण्यासह प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्यावर लक्ष ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या होत्या. त्यानंतर कामाचा वेग वाढविण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत.

नवी मुंबईतील घणसोली-ऐरोली खाडीवरील पामबीच मार्ग विस्तार प्रकल्पासाठी सिडकोकडून देय असलेला आर्थिक वाटा अद्याप महापालिकेला प्राप्त झालेला नसल्याची बाब स्थायी समितीच्या बैठकीत उघड झाली. सुमारे साडेपाचशे कोटी रुपयांच्या या संयुक्त



प्रकल्पात महापालिकेने स्वतःच्या निधीतून आतापर्यंत सुमारे ९० कोटी रुपये खर्च केले आहेत. मात्र, सिडकोकडून येणे असलेले सुमारे ४५ कोटी रुपये अद्याप न मिळाल्याने सदस्यांनी तीव्र चिंता व्यक्त करत प्रशासनाला निधी वसुलीसाठी पाठपुरावा अधिक प्रभावी करण्याच्या सूचना केली.

स्थायी समिती सभापती अशोक पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत अभियांत्रिकी विभागाने प्रकल्पाच्या आर्थिक आणि भौतिक प्रगतीची माहिती सादर केली. त्यानुसार या प्रकल्पाचा खर्च महापालिका आणि सिडको यांनी समप्रमाणात उचलण्याचे नियोजन असले, तरी सिडकोचा ५० टक्के आर्थिक वाटा अद्याप मिळालेला नाही. कामाच्या विविध टप्प्यांनुसार बिले सादर करून निधीची मागणी करण्यात आली असून सिडकोकडे तीन ते चार वेळा अधिकृत पत्रव्यवहारही करण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. मात्र, या मागण्यांवर सिडकोकडून अद्याप कोणतेही अधिकृत उत्तर प्राप्त झाले नसल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

यावर सदस्यांनी संयुक्त प्रकल्पात एका यंत्रणेचा आर्थिक वाटा इतका काळ प्रलंबित राहणे योग्य नसल्याचे मत व्यक्त केले. त्यामुळे कामाच्या प्रगतीनुसार सिडकोकडील देय रक्कम तातडीने वसूल करण्यासाठी अधिक आक्रमक भूमिका घेण्याचे निर्देश सभापती अशोक पाटील यांनी प्रशासनाला दिले.

शहराच्या वाहतूक व्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या या प्रकल्पाचे काम सुरू असले, तरी आर्थिक भागीदारीतील विलंबामुळे प्रकल्पाच्या पुढील टप्प्यांवर परिणाम होऊ नये, यासाठी सिडकोने आपला आर्थिक वाटा तातडीने उपलब्ध करून द्यावा, अशी अपेक्षा बैठकीत व्यक्त करण्यात आली.

घणसोली-ऐरोली खाडीवरील पामबीच मार्ग विस्तार प्रकल्पाचे मूळ नियोजन २००४ मध्ये करण्यात आले होते. बेलापूर ते घणसोली हा टप्पा पूर्ण झाल्यानंतर उर्वरित काम कांदळवन क्षेत्रातील पर्यावरणीय परवानग्या आणि प्रशासकीय प्रक्रियांमुळे अनेक वर्षे रखडले. त्यानंतर उन्नत पुलाचा पर्याय स्वीकारण्यात आला आणि आवश्यक मंजुरीनंतर फेब्रुवारी २०२५ पासून प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात झाली. सुमारे ५५० कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पात सुमारे ३.४७ किलोमीटर मार्ग विकसित होत असून त्यातील सुमारे १.९ किलोमीटर उन्नत पूल खाडीवर उभारला जात आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर घणसोली आणि ऐरोलीदरम्यान थेट दळणवळण उपलब्ध होईल, आणि नवी मुंबई, ठाणे तसेच मुंबईदरम्यानचा प्रवास अधिक वेगवान व सुलभ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## विद्यार्थ्यांची ड्रग्जविरोधी जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहाय्यक पोलीस निरीक्षक नीलेश चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना अमली पदार्थांचच्या दुष्परिणामांची जाणीव करून देत 'से नो टू ड्रग्ज' हा कानमंत्र दिला.

२६ जून रोजी जागतिक अमली पदार्थ विरोधी दिन साजरा करण्यात आला. नेरूळ पोलीसांकडून विद्याभवन शिक्षण संकुलात देखील ड्रग्स बाबत जागृती करण्यात आली. पोलीस इंस्पेक्टर संजय लाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक नीलेश चव्हाण, प्रचिती गडकरी, पोलीस उपनिरीक्षक किर्ती चव्हाण, सुषमा पाटील तसेच जावेद बागवान उपस्थित होते.

प्रचिती गडकरी यांनी महिलांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांची विद्यार्थ्यांना जाणीव करून दिली. फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉटसअप वरील अकाऊंट आणि फोटोंचा कसा गैरवापर होऊ शकतो याची माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांनी कोणत्या दक्षता घ्याव्यात आणि निर्भया पथकाचे कार्य याची जाणीव करून दिली.

नीलेश चव्हाण यांनी अमली पदार्थ, त्याचे प्रकार, त्याचे आपल्या मनावर, शरीरावर होणारे परिणाम, व्याधी, अपंगत्व, समाजावर होणारे दुष्परिणाम, सहज घेतल्या जाऊ शकतात अशा दक्षता याचे सादरीकरण विद्यार्थ्यांसमोर केले. सावध रहा, जागृत रहा आणि आपल्या आसपास जर काही चुकीचे घडत असेल तर पोलिसांना माहिती द्या असे आवाहन त्यांनी केले. किर्ती चव्हाण यांनी सर्व उपस्थिताना ड्रग्ज विरोधी शपथ दिली.

पोलीस निरीक्षक संजय लाड यांनी वाईट गोष्टींच्या आहारी जाण्यापेक्षा खेळ, व्यायाम आणि छंद जोपासण्याचा सल्ला दिला. पुणे विद्यार्थी गृहाचे कुलसचिव दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक गोरख कदम, समन्वयक पांडुरंग मुळीक,तसेच सर्व शिक्षक आणि विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविनाश कुलकर्णी यांनी केले.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग वर्षातून दोनदा पूर्वपरीक्षा घेणार

**नवी मुंबई : बातमीदार**

केरळ, तेलंगना, आंध्र प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू बिहार हिमाचल प्रदेश या राज्य लोकसेवा आयोगाकडून गट अ ब गट क पदांसाठी सीबीटी पद्धतीने परीक्षा घेतला जातात त्या धर्तीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ तसेच आगामी सर्व पूर्व परीक्षा सीबीटी पद्धतीने घेतल्या जाणार आहेत. त्याचप्रमाणे वर्षातून दोन परीक्षा घेण्यात येणार असून वर्षभरात त्याचे निकाल जाहीर करण्यात येणार आहेत, अशी माहिती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भिमनवार यांनी दिली.

सध्या सरकारी नोकरीमध्ये तितक्या संधी उपलब्ध नाहीत. दरवर्षी लाखोच्या संख्येने स्पर्धा परीक्षा विद्यार्थी येतात. मात्र यात उत्तीर्ण होण्याचे प्रमाण अवघे ५% आहे. अनेक वर्ष परीक्षेचा निकाल लागत नाही. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने वर्षातून दोनदा पूर्व परीक्षा घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

त्याचबरोबर विद्यार्थ्यांची असणारी क्षमता ही वाया जाऊ नये याकरिता आणि दुसरीकडे सरकारी सेवांमध्ये तितकी संधी उपलब्ध होत नसल्याने त्यांची गुणवत्ता पाहता खाजगी क्षेत्रातही स्पर्धा परीक्षा उमेदवारांना नोकरीची संधी देणार असल्याचे विवेक भिमनवार यांनी सांगितले.

## कोपरखैरणेतील शिल्प उपेक्षित : अनधिकृत चिकन-मच्छी विक्रीने आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेने शहराच्या स्वच्छता अभियानाला चालना देतानाच नवी मुंबईचा इतिहास, संस्कृती आणि वैशिष्ट्यपूर्ण ओळख जपण्यासाठी विविध चौकांमध्ये कोट्यवधी रुपये खर्च करून आकर्षक शिल्पांची उभारणी केली आहे. मात्र, या शिल्पांच्या देखभालीकडे होत असलेल्या दुर्लक्षामुळे त्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.नवी मुंबई महानगरपालिका प्रशासन तसेच संबंधित लोकप्रतिनिधींनी



या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन शिल्पाची दुरुस्ती, सुशोभीकरण, परिसराची स्वच्छता आणि अनधिकृत चिकन-मच्छी विक्रीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी दिव्यादीप फाउंडेशनचे अध्यक्ष प्रदीप म्हात्रे यांनी केली आहे.

कोपरखैरणे सेक्टर-८ येथील आर. एफ. नाईक विद्यालयाच्या पाठीमागील चौकात पृथ्वीच्या प्रतिकृतीसमोर दोन विद्यार्थी अभ्यास करत असल्याचे प्रतीकात्मक शिल्प काही वर्षांपूर्वी महानगरपालिकेने उभारले होते. शिक्षणाचे महत्त्व आणि ज्ञानाचा संदेश देणारे हे शिल्प आज दुर्लक्षित अवस्थेत असून परिसराची शोभा वाढवण्याऐवजी त्याची दुरवस्था नागरिकांच्या नजरेत भरत आहे.

याहूनही गंभीर बाब म्हणजे या शिल्पासमोरच अनधिकृतपणे चिकन व मच्छी विक्री सुरू असल्याने परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत आहे. या ठिकाणी दररोज शेकडो विद्यार्थी, पालक आणि नागरिकांची वर्दळ असते. दुर्गंधी, अस्वच्छता आणि सांडपाण्यामुळे आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून संसर्गजन्य आजारांचा धोका वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, संबंधित विक्रेत्यांवर कोणतीही प्रभावी कारवाई होत नसल्याने त्यांना प्रशासनाची भीती उरलेली नाही. सार्वजनिक ठिकाणी अशा प्रकारे सुरू असलेल्या अनधिकृत व्यवसायामुळे स्वच्छ शहराच्या संकल्पनेलाच तडा जात असून महानगरपालिकेच्या स्वच्छता अभियानावरही प्रश्न उपस्थित होत आहेत. विशेष म्हणजे, राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी स्थापन केलेल्या आर. एफ. नाईक विद्यालयाच्या परिसरातच ही परिस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

## सीबीडीमध्ये लायन्स पार्कचे उद्घाटन

### आमदार मंदा म्हात्रेंचा २५ लाखांचा निधी

**नवी मुंबई : बातमीदार**

आमदार मंदा म्हात्रे यांच्या आमदार विकास निधी अंतर्गत रु. २५ लाखांचा निधी उपलब्ध करून सीबीडी बेलापूर सेक्टर-३ए येथील लायन्स पार्क उद्यानामध्ये उभारण्यात आलेल्या भव्य योगा प्लॅटफॉर्म व निवारा शेडचे लोकार्पण माजी नगरसेवक अशोक गुरखे यांच्याहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. नगरसेविका व स्थायी समिती सदस्या स्वाती गुरखे, नगरसेविका सुरेखा नरबागे, आरोग्य सभापती डॉ. जयाजी नाथ, भाजपा नेते व महामंत्री निलेश म्हात्रे, सीबीडी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण पवार, गोपाळराव गायकवाड, अजय



सिंग, सरिता पवार, एल. जी. वार, प्रभाकर कांबळे, दामोदर पिल्ले, आरती राऊळ, रेखा गोदाम, ज्योती पाटील, अलका कामत, जयराम पासवान, चंद्रकांत कोळी, सुरेश कोळी, तुकाराम कोळी, मनेश बिजलानी, राजू कोळी, समीर मनोरे, इजाज खान, जयसिंग पवार, मनोज म्हात्रे, नम्रता पवार, संजय ओबेरॉय, सिमरन शर्मा उपस्थित होते.

या नव्या सुविधेमुळे सकाळ-संध्याकाळ योगाभ्यास, व्यायाम तसेच विविध सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमांसाठी नागरिकांना सुसज्ज जागा उपलब्ध झाली असून पावसाळ्यातही योगाभ्यासात कोणताही अडथळा येणार नाही. नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला असल्याचे यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

यावेळी मंदा म्हात्रे यांनी सीबीडी परिसरातील आगामी विकासकामांची माहिती देताना सांगितले की, आमदार विकास निधीतून पुढील काही महत्त्वाची कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यामध्ये कस्तुरबा उद्यानात योगा प्लॅटफॉर्म व निवारा शेड उभारणे, नागेश्वर मंदिर परिसरात योगा प्लॅटफॉर्म व सभामंडप उभारणे तसेच गौरव क्रीडा केंद्रासमोर योगा प्लॅटफॉर्म व निवारा शेड उभारणे या कामांचा समावेश आहे.

## आणीबाणी म्हणजे लोकशाहीचा खून -डॉ. राजेश पाटील

**नवी मुंबई : बातमीदार**

आणीबाणीला ५१ वर्षे पूर्ण झाल्या निमित्त भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नवी मुंबई भारतीय जनता पक्षातर्फे नेरुळ येथील शिरवणे विद्यालय व ज्यु कॉलेज येथे २५ जून हा काळा दिवस म्हणून कार्यक्रम करण्यात आला. जिल्हाध्यक्ष डॉ.राजेश ज.पाटील यांच्या हस्ते प्रदर्शनीचे अनावरण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या प्रसंगी कोकण संवादक अभिजित पेडणेकर, शाळेच्या प्राचार्या भाग्यश्री चौधरी, परिवहन समिती सदस्य राजेश राय,माजी नगरसेविका उषा भोईर, मंडळ अध्यक्ष संतोष नाईक, मंडळ अध्यक्ष अजय सिंग, ज्येष्ठ समाजसेवक गोपाळराव गायकवाड,जगन्नाथ जगताप,मिलिंद चंदुरकर, रामकृष्ण अय्यर, शशी नायर,उज्वला जगताप, गुलाबराव खंधारे, सौ. सुमा रंजिथं, नरेश सुतार, रामदीप



हलवाई, निनाद होनराव तसेच विध्यार्थी, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष व नगरसेवक रामचंद्र घरत यांनी देखील उपस्थितांना संबोधित केले. या कार्यक्रमाला वक्ता म्हणून मिलिंद चंदुरकर यांनी सविस्तर व विस्तृतपणे या काळ्या दिवसासंदर्भात माहिती दिली.

यावेळी डॉ. राजेश पाटील यांनी उपस्थित शालेय विद्यार्थ्यांना त्यावेळी कसे नागरिकांवर अन्याय व अत्याचार झाले, त्याविषयी माहिती दिली. ते म्हणाले, २५ जून १९७५ रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आणीबाणी लागू करून लोकशाहीचा खून केला. तो दिवस काळा दिवस म्हणून गणला जातो. ज्याचे दुष्परिणाम संपूर्ण देशाला भोगावे लागले. नागरिकांचे हक्क पायदळी तुडवले गेले. या सगळ्याची माहिती नव्या पिढीला कळायला पाहिजे. यासाठी हा आणीबाणी कार्यक्रम व प्रदर्शनी ठेवण्यात आली. तसेच वक्ता मिलिंद चंदूरकर यांनी विद्यार्थी व कार्यकर्त्यांना समजेल अशा सोप्या भाषेत आणीबाणीविषयी माहिती दिल्याचे त्यांनी सांगितले.

## उरण तालुक्यात पावसाच्या अभावाने रानभाज्यांची अजून प्रतीक्षाच

**उरण : प्रतिनिधी**

पावसाचा जोर अद्याप वाढलेला नाही. त्यामुळे पावसाळयात नैसर्गिकरित्या. उगवणाऱ्या आरोग्यवर्धक रानभाज्यांची प्रतीक्षा कायम आहे. गेल्या वर्षी मे महिन्यातच पाऊस सुरू झाल्याने रानभाज्या आणि कंद लवकरच बाजारात विक्रीसाठी आले होते. मात्र यावर्षी जून महिन्याची अखेर येऊनही पावसाच्या अभावामुळे रानभाज्या उगवलेल्या नाहीत.

उरण तालुका बहुतांश डोंगराळ आणि जंगलांनी वेढलेला असल्याने या तालुक्यात अनेक दुर्मिळ आणि औषधी वनस्पती फळे आणि रानभाज्या आढळून येतात. उन्हाळा संपून पावसाळ्याची चाहूल लागली की, या भागातील आदिवासी जंगल, डोंगर आणि रानमाळात उगवणारे करांदे, हळदे यासारखे कंद गोळा करून, त्याची उरण, पनवेल येथील बाजारात विक्री करून आपली उपजीविका करतात.


तसेच शेवळा, टाकळा, कंटोली, कोरळा, यासारख्या रानभाज्या पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात मिळत



असल्याने, या भागातील बाजारपेठा या रानभाज्यांनी भरून जातात. दरवर्षी पावसाळ्यात या रानभाज्या मिळत असल्याने खवय्यांना देखील या भाज्यांचे वेध लागलेले असतात. पावसाळ्यात बहुतांश आदिवासींना रोजगार नसल्याने तालुक्यातील बहुतेक आदिवासी रानभाज्या गोळा करण्याचा आणि विकण्याचा व्यवसाय करतात. आणि त्यावरच त्यांचा उदरनिर्वाह चालतो.

गेल्या काही वर्षांपासून उरण तालुक्यात विकासाच्या नावाखाली प्रचंड प्रमाणात भरावाची कामे सुरू आहेत. त्यामुळे मातीसाठी या भागातील जंगले, डोंगर, आणि माळराने पोखरली जात आहेत. त्याचा परिणाम येथील कंद, रानभाज्यांवर झाला आहे. जंगल, डोंगरातून मिळणाऱ्या रानभाज्या आणि कंदाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटले आहे. त्यामुळे पूर्वी एक दोन तासात गोळा करता येणाऱ्या रानभाज्या गोळा करण्यासाठी आता पूर्ण दिवस लागत आहे. अशी माहिती एका आदिवासी महिलेने दिली. तसेच निसर्ग वाचविण्यासाठी शासनाने या भागातील माती काढण्यास बंदी आणावी. अशी मागणी देखील येथील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

पावसाळा सुरू झाला की डोंगराळ भागात डोंगरमाथ्याला या भाज्या तयार होतात. त्यांना रानभाज्या असे म्हटले जाते. या भाज्या कोणतेही खते आणि कीटकनाशकांच्या वापराशिवाय मिळत असल्याने, या भाज्या पौष्टिक आणि औषधी असतात. त्यामुळे या भाज्यांच्या खरेदी कडे ग्राहकांचा कल अधिक असतो .यामध्ये कुलू, अंबाडी, शेवळा, टाकळा, भारंगी कंटोळे अशा रानभाज्यांचा समावेश आहे.



## विद्याभवनमध्ये आवाजाची कार्यशाळा

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरुळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत प्रसिद्ध निवेदक राजेश तांबडे यांनी विद्यार्थ्यांसाठी आवाजाची कार्यशाळा घेतली.

प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाबरोबर विविध कलागुण, कौशल्ये विकसित होण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना त्यांचे छंद व आवडी ओळखता व जोपसता यावेत यासाठी आनंददायी शनिवार उपक्रम शाळांमधून राबवले जात असतात. विद्याभवनमध्ये दरवर्षी अशा उपक्रमांचे वैविध्य दिसून येते. स्वरांचा उगम, प्रकार, श्वासाचा योग्य वापर, हावभाव, हातवारे, पूर्वतयारी, सराव, चढउतार, काळजीपूर्वक श्रवणाची आवश्यकता, आत्मविश्वास, संवाद साधताना, निवेदन देताना घ्यावयाच्या दक्षता, अभ्यास या बाबींवर विशेष लक्ष देण्यात आले. व्यक्तिमत्व घडण्यासाठी उत्कृष्ट संवादाची आवश्यकता राजेश तांबडे यांनी स्पष्ट केली. विद्यार्थ्यांनी उत्फूर्तपणे संवादाची प्रात्यक्षिके केली. सदर सत्र मराठी भाषेतून घेण्यात आले.

## अटल सेतू-गव्हाण फाटा मार्गावील वाहतूककोंडी फुटणार; वाहतुकीत बदल

**उरण: रामप्रहर वृत्त**

बेलापूर-उरण-पनवेल महामार्गावरील सातत्याची वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि 'अटल सेतू'कडे जाणाऱ्या वाहनांचा प्रवास सुसाट व्हावा यासाठी नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

गव्हाणफाटा वाहतूक विभागांतर्गत वाढलेली अवजड वाहनांची संख्या आणि सुरू असलेल्या पुलाच्या कामांमुळे निर्माण होणारी कोंडी लक्षात घेता, आज म्हणजेच २६ जूनपासून जड वाहनांना वहाळ पुलाच्या डाव्या बाजूने चालवण्याचे नवे नियम लागू करण्यात आले आहेत.

नवी मुंबई वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त राहुल खाडे यांनी जारी केलेल्या अधिकृत आदेशानुसार, गव्हाणफाटा भागात अवजड आणि अतिविशाल वाहनांची वर्दळ प्रचंड वाढली आहे.त्यातच या भागात सुरू असलेल्या पुलाच्या बांधकामामुळे जंगलकट आणि चिरनेर फाटा परिसरात दररोज मोठी कोंडी होत आहे. या कोंडीमुळे थेट अटल सेतूकडे जाणारी मार्गिका अडकून पडत असून, याचा फटका आपत्कालीन सेवांच्या वाहनांना आणि व्हीव्हीआयपी ताफ्यांना बसत होता.

यावर उपाय म्हणून आता नवीन




रचनेनुसार, महामार्गावरून किल्ला जंक्शनकडून गव्हाणफाटाच्या दिशेने जाणाऱ्या सर्व जड वाहनांना वाहल पुलाच्या डाव्या बाजूने जाण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.गव्हाणफाटा येथील वाहतुकीची परिस्थिती पाहून पोलीस या जड वाहनांना पुलावरच काही काळ रोखून धरतील आणि टप्प्याटप्प्याने पुढे सोडतील. जड वाहने डाव्या बाजूने जात असताना, कार आणि इतर हलकी वाहने नेहमीप्रमाणे पुलाच्या उजव्या बाजूने धावतील.

# साजगाव हद्दीतील महिलांची पाण्यासाठी वणवण

**खालापूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील साजगाव ग्रामपंचायत हद्दीतील रहिवाशांना सहा दिवस पाणीच न आल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतोय. पाणी योजनेचा पंप नादुरुस्त झाल्याने महिलांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असताना ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षाने प्रचंड संताप आहे.

निवडून दिलेले लोकप्रतिनिधी काय करतायेत असा सवाल संतप्त महिलांकडून उपस्थित केला जात असून रखडलेल्या पाणी योजनेमुळे भविष्यात पाण्यासाठी अशीच वणवण करण्याची वेळ साजगाव परिसरातील ग्रामस्थांवर येण्याची शक्यता आहे.



तालुक्यातील साजगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीत साजगाव, ढेकू आणि सारसन या तीन गावांचा समावेश आहे. सहा दिवसांपुर्वी तीनही गावांना पाणी पुरवठा करणाऱ्या पाणी योजनेचा पंप नादुरुस्त झाला. सध्या जुनचा शेवटचा आठवडा सुरू असून पाऊस न झाल्याने पाण्याची पातळी खाली गेली असून गेली काही दिवस पुरेसा पाणी पुरवठा होत नव्हता. त्यातचं सहा दिवसांपासून पाणीचं न आल्याने हंडाभर पाण्यासाठी महिलांना वणवण करावी लागत आहे.

तीनही गावात पाण्याचा गंभीर प्रश्न असताना नादुरुस्त असलेला पंप दुरूस्त करण्याचा प्रयत्न करण्याखेरीज ग्रामपंचायतीने कोणतीही ठोस उपाययोजना केली नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जातोय.

पाण्यामुळे आपल्याच लोकांचे प्रचंड हाल होत असल्याने टँकरद्वारे पाणी पुरवठा करावा याचे भानही प्रशासनाला नसल्याने अनेक लोकांनी खासगी टँकर मागवून पाणी टंचाईवर तात्पुरता उपाय शोधण्याचा प्रयत्न केला आहे. सगळ्यांनाच खासगी टँकर मागवणे शक्य नसल्याने काय करायचे असा प्रश्न उपस्थित होत असून सरपंच , उपसरपंच , ग्रामसेवक स्नेहल घोसाळकर सदस्यांच्या विरोधात प्रचंड नाराजी व्यक्त केली जात आहे. जिल्हा परिषद सदस्या रेश्मा पाटील ढेकूमध्ये तर पंचायत समितीच्या सदस्या देवयानी देशमुख साजगावमध्ये राहतात तरीही ग्रामपंचायत हद्दीतील रहिवाशांना सहा दिवस पाण्यावाचून काढावे लागले आहेत.

राष्ट्रीय पेय जल योजनेतून सुरू असलेल्या ४ कोटी रुपयांच्या पाणी योजनेचे काम चार वर्ष रखडले असून जिल्हा परिषदेचे माजी सभापती नरेश पाटील यांच्या मर्जीतील ठेकेदार बबलू उर्फ दिपेश मोरे या योजनेचे काम करतायेत. मोरे यांच्याकडे तालुक्यातील १४ योजनांची कामे असून सर्वचं योजना अर्धवट असताना बबलू मोरे यांना नेमका कुणाचा आशिर्वाद आहे. असा सवाल या निमित्ताने उपस्थित केला जातोय. नादुरुस्त झालेला पंप दुरूस्त होत नसल्याने नविन पंप मागवला असून लवकरच पाणी पुरवठा पुर्ववत होईल असा दावा सरपंच विनोद खवळे यांनी सांगितले.

# काशिद शाळेस पालकांकडून स्वयंपाकाच्या भांड्यांची भेट



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील काशीद रायगड जिल्हा परिषद शाळा येथे विद्यार्थ्यांना मध्यान्ह पोषण आहार स्वच्छ, सुरक्षित व दर्जेदार पद्धतीने तयार करता यावा या उद्देशाने पालकांनी पुढाकार घेत स्वयंपाकासाठी आवश्यक साहित्य शाळेला भेट दिले.

या उपक्रमांतर्गत मोठे पातेले, टोप, झाकण, कुकर, शेगडी, रेग्युलेटर तसेच इतर आवश्यक स्वयंपाकाची भांडी शाळेला प्रदान करण्यात आली. या साहित्यामुळे मध्यान्ह पोषण आहाराची व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार असून विद्यार्थ्यांना स्वच्छ व गुणवत्तापूर्ण आहार उपलब्ध करून देणे अधिक सुलभ होणार आहे.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा स्मिता जाधव, सदस्य अरविंद घोले, रुपाली महाडिक, जान्हवी खेडेकर, सुवर्णा दिवेकर, ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र पाटील तसेच मुख्याध्यापक हेमकांत गोयजी उपस्थित होते.

# पेण येथे रायगडच्या पशुसंवर्धन भागधारकांची कार्यशाळा

**पेण : प्रतिनिधी**

अमेरिका इराण यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीत ज्याप्रमाणे डिझेलची कमतरता भासली त्याप्रमाणे भविष्यात दूध व मांस याची कमतरता भासू नये यासाठी पशुसंवर्धन खात्याच्या माध्यमातून आपला भारत देश दूध आणि पशु पालनात जगात अव्वल स्थान कसे प्राप्त करेल या उद्देशाने आपल्या रायगड जिल्ह्याचा मोलाचा वाटा असला पाहिजे यासाठी सर्वांनी प्रयत्न करूया अशा प्रकारचे वक्तव्य पेण येथे झालेल्या रायगड जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन भागधारकांच्या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील यांनी केले.

यावेळी व्यासपीठावर रायगड जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील यांच्यासह मुंबई विभाग प्रादेशिक सहआयुक्त डॉ प्रशांत कांबळे, जिल्हा उपयुक्त डॉ सचिन देशपांडे, पेण पंचायत समितीच्या सभापती स्मिता पाटील, उपसभापती संजय डंगर, पंचायत समिती सदस्या मेघा पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे सर्व पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त, पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक उपस्थित होते.





राज्य शासनाने कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या लाभार्थ्यांना जास्तीत जास्त लाभ घेता यावा यासाठी भरघोस निधी उपलब्ध केले आहे. त्या अनुषंगाने आज योजनांची माहिती आणि त्या संदर्भातील प्रात्यक्षिके सादर करून लाभार्थ्यांपर्यंत योजना कशा पोहोचतील या उद्देशाने ही एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. वैकुंठ पाटील यांनी पुढे बोलताना सांगितले की यावर्षीच्या या लाभधारकांमधे आम्ही जवळपास तीन हजार तरी लाभार्थ्यांना लाभ मिळवून देऊ असा उद्देश ठेवला होता, मात्र साडेतीन हजार लाभार्थ्यांनी अर्ज सादर केले असून या सर्वच्या सर्व लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी आम्ही आणि आमचे अधिकारी प्रयत्नशील असतील.

ज्याप्रमाणे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारत निर्माण करण्याचे स्वप्न साकारले आहे त्याप्रमाणेच पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून आमच्या रायगड जिल्ह्यातील प्रत्येक लाभार्थी योजनांच्या माध्यमातून आत्मनिर्भर कसा होईल याकडे आमचे विशेष लक्ष असणार आहे. या लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी सर्व लाभार्थ्यांचे अर्ज पोर्टलवर लोड करण्यासाठी कर्मचाऱ्यांनी मेहनत घेण्याचे आदेश त्यांनी दिले असून कोकण आयुक्तांनी रायगड जिल्ह्यातील पेण येथे जो कार्यालय नव्याने कार्यान्वित होत आहे आणि ज्या ठिकाणी कोकणातील सर्वात मोठी लॅब होणार आहे त्या कार्यालयासाठी लवकरात लवकर निधी उपलब्ध करून द्यावा अशा प्रकारची मागणी देखील वैकुंठ पाटील यांनी केली आहे. तर पशुसंवर्धन मुंबई विभागाचे सहआयुक्त डॉ प्रशांत कांबळे यांनी कोकण विभागातील ही भव्य कार्यशाळा आहे अशी स्तुतीसुमने वाहून जास्तीत जास्त पशु धारकांनी या कार्यशाळेचा पूरेपूर वापर करून घेऊन कार्यशाळा यशस्वी करण्याचे आवाहन लाभधारकांना केले आहे.



# रोह्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा पुतळा स्थापन करणार -मंत्री तटकरे

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा नगरपरिषद हद्दीत पावसाच्या आधी मर्यादित कालावधीत रस्त्याची कामे झाली आहेत. रोहा शहर व लगतची ग्रामपंचायत वरसे येथे मोठ्या प्रमाणात विकास कामे होत आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने असलेल्या उद्यानात त्यांचा पुतळा दर्शनस्थळी स्थापण करणार आहोत.विशेषसत्र म्हणुन उद्यानात योग प्रशिक्षण वर्ग घेण्यात यावे. असे सांगात यावेळी नगराध्यक्ष वनश्री शेडगे व नगरपरिषद सभापती, नगरसेवक व नगरपरिषद टिमचे ना.आदीती तटकरे यांनी कौतुक केले.

रोहा अष्टमी नगरपरिषद हद्दीतील रस्ते, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुष्करणी उद्यान सुशोभीकरण, कै.द.ग.तटकरे इनडोअर स्टेडियम इमारतीतील, बॅडमिंटन कोर्टचे नुतनीकरण करणे, रोहा बस स्थानकात हिरकणी कक्ष उभारणे या कामाच्या लोकार्पणप्रसंगी ना. आदिती तटकरे बोलत होत्या

यावेळी आमदार अनिकेत तटकरे, जि.प.उपाध्यक्ष मधुकर पाटील, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, गटनेते महेंद्र गुजर, सभापती महेश कोलाटकर, राजेंद्र जैन, महेंद्र दिवेकर, निता हजारे, रवी चाळके, गौरी बारटक्के, नगरसेविका पुर्वा मोहीते, संजना शिंदे, प्रियांका धनावडे, सुप्रिया जाधव, आलमास मुमैरे, अफरीन रोगे, दिवेश जैन, माज सवाल, अरबाज मणेर आदी उपस्थित होते.

यावेळी आमदार अनिकेत तटकरे यांनी दुसऱ्यांदा आमदारकीची शपथ घेतल्यानंतर आता अधिक जबाबदारीने काम करणार आहे.कंपन्याच्या सीएसआर फंडातुन खा.सुनील तटकरे यांनी अधिका अधिक निधी आपल्यासाठी आणले आहे. पाण्यासाठी दुसरी लाईन साठी साडे अकरा कोटीचा निधी उपलब्ध होत आहे.डपींग ग्राउंडमध्ये सुधारणा करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल.खा.सुनील तटकरे यांच्या संकल्पनेतून रोहा शहर घडविण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत, असे सांगितले.

# खासदार संजय पाटलांच्या वक्तव्याचा महाड पत्रकार संघाकडून जाहीर निषेध!

**महाड : प्रतिनिधी**

खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना जीवे ठार मारण्याची धमकी देत अश्लील भाषेत शिवीगाळ केला भाषेत शिवीगाळ केल्याप्रकरणी कायदेशीर कारवाई करण्याची मागणी महाड पत्रकारांनी महाड शहर पोलीस ठाण्यात निवेदन देऊन संजय दिना पाटील यांच्या वक्तव्याच्या जाहीर निषेध केला.

खासदार संजय दिना पाटील यांनी प्रतिक्रिया घेण्यास गेलेल्या पत्रकारांना अश्लील भाषेत शिवीगाळ करून जीवेत ठार मारण्याची धमकी दिली. सदरचा व्हिडिओ समाज माध्यमांवर प्रसारित झाल्याने हा लोकशाहीचा चौथा स्तंभ उध्वस्त करण्याचा प्रयत्न असून त्या विरोधात कडक शासन व्हावे म्हणून महाड तालुक्यातील सर्व पत्रकारांनी एकत्र येत, खासदार संजय दिना पाटील यांचा वक्तव्याचा जाहीर निषेध केला. त्यानंतर महाड शहर पोलीस ठाण्यात श महाड शहर पोलीस ठाण्याचा नव्याने पदभार स्वीकारलेले पोलीस निरिक्षक नारायण एकशिंगे यांना निवेदन सादर करी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

महाड पत्रकारांनी दिलेल्या निवेदनामध्ये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३५१(२) अन्वये जिवे मारण्याची धमकी देणे, भारतीय न्याय संहिता कलम ३५२ शांतता भंग करण्याच्या उद्देशाने हेतू पुरसर अपमान करणे, कलम ७९ महिलांच्या विनयशीलतेचा अपमान करणारी भाषा वापरणे, तसेच कलम ३५६ अनुसार मानहानी या अंतर्गत दखलपात्र गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच महाड तालुक्यातील पत्रकारांच्या सुरक्षेची हमी द्यावी व आम्हाला निर्भयपणे काम करता येईल असे वातावरण निर्माण करावे, अशी मागणी पत्रकारांच्या वतीने करण्यात आली.

तसेच राज्य सरकारने तात्काळ पत्रकार सुरक्षितता कायदा लागू करावा अशी मागणी उपाध्यक्ष महेश शिंदे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली. या वेळेला महाड पत्रकारांकडून महाड पत्रकार संघाचे अध्यक्ष उदय सावंत , उपाध्यक्ष महेश शिंदे, मुदसशीर पटेल, दिनेश पिसाट, रेश्मा माने ,मनोज चेंडेकर, रघुनाथ भागवत, रामदास चव्हाण, मिलिंद माने, श्रीकृष्ण आप्पा बाळ, आमिर तार लेंकर, अभिषेक बुडबाडकर, राजेंद्र जयतपाल, जुनेद तांबोळी ,प्रवीण कुलकर्णी ,उत्तम तांबडे, सुनील पाटकर, समीर बुटाला इत्यादी पत्रकार या वेळेला महाड शहर पोलीस ठाण्यात निवेदन देण्यास उपस्थित होते.



# स्पर्धा परीक्षा पूर्वतयारीसाठी तांबाटी ग्रामपंचायतीकडून अभ्यासिका

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यातील लहानशा खेड्यातून सुद्धा शासनामध्ये उच्च पदावर काम करणारे अधिकारी निर्माण व्हावे या दृष्टीकोनातून तांबाटी ग्रामपंचायतचे सरपंच अविनाश आमले आणि ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत कदम यांनी अभ्यासिका केंद्र निर्माण करण्याचे ठरवले आणि गोदरेज कारखाना पाठबळातून तांबटी येथे सुसज्ज अस अभ्यासिका उभी राहिली आहे.

रायगड जिल्ह्यातून स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अल्प असून स्पर्धा परीक्षा तयारीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा नसल्याने विद्यार्थी इतर क्षेत्राकडे वळतात. तांबटी गावचे अभ्यासू सरपंच अविनाश आमले यांनी ही समस्या ओळखून त्यासाठी पाठपुरावा सुरू केला.तांबटी ग्रामपंचायतची जुनी इमारतीचे रूप पालटून त्या ठिकाणी गोदरेज कारखान्याच्या सहकार्याने वातानुकूलित असे अभ्यासिका केंद्र तयार केले असून त्याचे उद्घघाटन पंचायत समिती सभापती कृष्णा पारंगे,उपसभापती भाई शिंदे, खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या हस्ते करण्यात आले. तांबाटी ग्रामपंचायत स्पर्धा परिक्षा अभ्यासिका केंद्र सुरू करणारी जिल्ह्यातील पहिली ग्रामपंचायत ठरली आहे.यावेळी



जिल्हा परिषदेचे सदस्य संतोष बैलमारे, पं.स.सदस्या प्रमिला पाटील, माजी सनदी अधिकारी आर.बी.गायकवाड, शिरवली ग्रामपंचायतीचे सरपंच महेश पाटील, वडवळचे सरपंच ज्ञानेश्वर सुतार, उपसरपंच भाग्यश्री सावंत, माजी सरपंच जितेंद्र सकपाळ, तांबाटी ग्रामपंचायतीचे सरपंच अविनाश आमले, ग्रामविकास अधिकारी प्रशांत कदम.

उपसरपंच अरुणा सावंत, सदस्य नितीन कदम, संतोष दळवी, हरिभाऊ जाधव, रितेश मोरे, सुरेश पवार, सदस्या प्राजक्ता पाटील, सुगंधा जाधव, अस्मिता कदम, शितल पाटील, कविता मिरकुटे यांच्यासह ग्रामस्थ महिला व विद्यार्थी उपस्थित होते.

# अशोक ल.लोखंडे विद्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात

**मुरुड : प्रतिनिधी**

पिटसई येथील अशोक ल.लोखंडे विद्यालयात आज राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंती निमित्ताने एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या शाळेचे चेअरमन गणपत जगताप ,मुख्याध्यापक अकिल मुलाणी सर यांच्या शुभ हस्ते शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पमाला व फुले अर्पण करून उपस्थित शालेय विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची माहिती विशद करण्यात आली.या जयंतीचे औचित्य साधून सन २०२५ -२६ या शैक्षणिक वर्षात शाळेच्या ग्रंथालयातून ज्या विद्यार्थ्याने जास्तीत जास्त पुस्तके वाचली त्या शालेय विद्यार्थ्यांना उत्कृष्ट वाचक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.



उत्कृष्ट वाचक पुरस्कार मध्ये प्रथम क्रमांक इयत्ता पाचवी मधील विद्यार्थिनी रुची संदीप मोडक हिला प्राप्त झाला आहे.या विद्यार्थिनिस रोख रक्कम ५०० रुपये व प्रमाणपत्र पेन देण्यात आले.तर द्वितीय क्रमांक नैतिक महाजन याला प्राप्त झाला असून रोख रक्कम ३०० रुपये व प्रमाणपत्र पेन तृतीय क्रमांक रुद्र मनोहर शिंदे याला प्राप्त झाला असून रोख रक्कम २०० रुपये व प्रमाणपत्र पेन तर उत्तेजनार्थ बक्षीस क्रीतिका अजित साळवी व कृष्णाई नीलेश पांढरकामे याना सुद्धा रोख रक्कम दोनशे व प्रमाणपत्र बहाल करण्यात आले आहे .

सर्व यशस्वी व पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार शाळेचे चेअरमन गणपत जगताप, मुख्याध्यापक अकील मुलाणी सर यांच्या हस्ते करण्यात आला.सदरील कार्यक्रमास माजी मुख्याध्यापक अरुण खुळपे, सुप्रिया रेडीज , संजय ठमके, सुखदेव सवइसर्जे, नीलम गोळे, संदीप इंगावले, सुनील तेलंगे, एकनाथ कोळी,वरिष्ठ लिपीक दीपक भोसले व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह असंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# हॉकीत भारताचे पाकवर वर्चस्व कायम!

## प्रो लीगमध्ये ७-१ने दणदणीत विजय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताच्या हॉकी संघाने पाकिस्तानवर दणदणीत विजय मिळवत आपला अपराजित राहण्याचा विक्रम कायम राखला आहे. लंडन येथील ली व्हॅली हॉकी अँड टेनिस सेंटरमध्ये २६ जून रोजी खेळल्या गेलेल्या २०२५-२६ एफआयएच (FIH) प्रो लीगच्या आपल्या उपांत्य सामन्यात संघाने ७-१ असा विजय मिळवला आणि गेल्या एका दशकापासून सुरू असलेली विजयाची मालिका आबाधित ठेवली. २३ जून रोजी याच मैदानावर ४-३ असा विजय मिळवल्यानंतर भारतीय संघाने आपल्या कट्टर प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध अवघ्या चार दिवसांत हा दुसरा विजय नोंदवला.



पाकिस्तानने या सामन्यात १३ व्या मिनिटालाच पहिला गोल करून भारतावर १-० अशी आघाडी घेतली. पाकिस्तानसाठी अबू महमूदने पहिला गोल केला, मात्र त्यानंतर भारतीय खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली आणि उर्वरित सामन्यात पाकिस्तानला एकही गोल करू दिला नाही. दुसऱ्या सत्रात सुखजीत सिंगने २० व्या मिनिटाला गोल करत भारताला सामन्यात बरोबरीत आणलं. त्यानंतर भारतीय संघाने अधिक आक्रमक खेळ केला; २६ व्या मिनिटाला कर्णधार हरमनप्रीत सिंगने पेनल्टी कॉर्नरद्वारे शानदार गोल करत संघाला सामन्यात २-१ अशी आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या सत्राच्या अखेरीस भारताकडे २-१ अशी आघाडी होती.

दुसऱ्या सत्रात एक दुर्दैवी घटना घडली, ज्यामध्ये पाकिस्तानी खेळाडू अहमद नदीमच्या डोळ्याला गंभीर दुखापत झाली. वैद्यकीय उपचारानंतर त्याला स्ट्रेचरवरून मैदानाबाहेर नेण्यात आलं. त्यानंतर तिसऱ्या सत्रात हार्दिक सिंग (३४ व्या मिनिटाला), जुगराज सिंग (३५ व्या मिनिटाला), अभिषेक (४१ व्या मिनिटाला) आणि राजकुमार पाल (४४ व्या मिनिटाला) यांनी गोल केले; तर अंतिम सत्रात दिलप्रीत सिंगने केलेला गोल (५४ व्या मिनिटाला) म्हणजे 'सोने पे सुहागा' ठरला आणि भारताचा ७-१ असा मोठा विजय निश्चित झाला.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात खेळल्या गेलेल्या गेल्या १९ सामन्यांपैकी भारतीय संघाने १७ सामने जिंकले आहेत, तर पाकिस्तानला एकही विजय मिळवता आलेला नाही. भारताच्या या विजयाच्या मालिकेची सुरुवात १२ एप्रिल २०१६ रोजी क्वालालंपूरमधील 'सुलतान अझलन शाह' स्पर्धेतील एका सामन्याने झाली होती. ऑलिम्पिकमध्ये आठ वेळा सुवर्णपदक जिंकणाऱ्या भारतीय संघाला आपल्या कट्टर प्रतिस्पर्ध्यांकडून शेवटचा पराभव २०१६ मध्ये गुवाहाटी येथे झालेल्या 'दक्षिण आशियाई क्रीडा स्पर्धां'मध्ये पत्करावा लागला होता.

# मीराबाईच्या नेतृत्वाखाली राष्ट्रकुल स्पर्धेसाठी भारतीय वेटलिफ्टिंग संघ सज्ज

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



ग्लासगो येथे होणाऱ्या २०२६ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय वेटलिफ्टिंग संघाची घोषणा करण्यात आली असून ऑलिम्पिक पदक विजेती मीराबाई चानू या संघाचे नेतृत्व करेल. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत दोनदा सुवर्णपदक जिंकणारी मीराबाई महिलांच्या ४८ किलो वजनी गटात स्पर्धा करेल; या गटात तिने आंतरराष्ट्रीय स्तरावर यापूर्वीही मोठे यश मिळवले आहे. भारताच्या सर्वात यशस्वी वेटलिफ्टर्सपैकी एक असलेल्या मीराबाई चानूने आतापर्यंत राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत तीन पदके जिंकली आहेत.

माजी विश्वविजेती आणि टोकियो २०२० ऑलिम्पिकमधील रौप्यपदक विजेती असलेल्या मीराबाईने यापूर्वी फेब्रुवारीमध्ये मोदीनगर येथे झालेल्या राष्ट्रीय चॅम्पियनशिपमध्ये भाग घेतला होता आणि ४८ किलो वजनी गटात विजेतेपद पटकावले होते. मात्र या वर्षाच्या सुरुवातीला झालेल्या खांद्याच्या दुखापतीतून सावरत असल्याने तिला मे महिन्यातील आशियाई वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिपला मुकावे लागले होते. चानूच्या सोबतीला बर्मिंगहॅम २०२२ मधील पदक विजेत्या बिंद्याराणी देवी आणि हरजिंदर कौर असतील, ज्या अनुक्रमे महिलांच्या ५८ किलो आणि ६९ किलो वजनी गटात स्पर्धा करतील. या दोघींनीही स्पर्धेच्या मागील आवृत्तीत रौप्यपदके जिंकली होती. पुरुषांच्या गटात, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२२ मधील कांस्यपदक विजेता लवप्रीत सिंग +११० किलो वजनी गटात भारताचे प्रतिनिधित्व करेल.

ऋषिकंत सिंग (६० किलो), अजय बाबू (७९ किलो) आणि दिलबाग सिंग (९४ किलो) हे खेळाडू ग्लासगो येथे होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पदार्पण करतील. २०२६ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील वेटलिफ्टिंगच्या स्पर्धा २६ ते ३० जुलै या कालावधीत 'एसईसी आर्माडिलो' येथे होणार आहेत. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील वेटलिफ्टिंगमध्ये भारताची कामगिरी अलीकडील स्पर्धांमध्ये उत्कृष्ट झाली आहे. गोल्ड कोस्ट २०१८ आणि बर्मिंगहॅम २०२२ या दोन्ही स्पर्धांमध्ये भारताने अव्वल देशांमध्ये स्थान मिळवले होते. बर्मिंगहॅम स्पर्धेत भारतीय वेटलिफ्टर्सनी पाच सुवर्णपदकांसह एकूण नऊ पदके जिंकली होती.

### भारताचा वेटलिफ्टिंग संघ

महिला : मीराबाई चानू (४८ किलो), ज्ञानेश्वरी यादव (५३ किलो), बिंद्याराणी देवी (५८ किलो), हरजिंदर कौर (६९ किलो), संजना (७७ किलो), मार्टिना देवी (+८६ किलो)

पुरुष : ऋषिकांत सिंग (६० किलो), एम. राजा (६५ किलो), अजय बाबू (७९ किलो), दिलबाग सिंग (९४ किलो), लवप्रीत सिंग (+११० किलो).

# स्पेनचा उरुग्वेवर १-०ने विजय; उरुग्वे स्पर्धेबाहेर



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

स्पेनने उरुग्वेचा १-० असा पराभव करत फिफा विश्वचषक स्पर्धेच्या राऊंड ऑफ ३२ मध्ये धडक मारली. दुसरीकडे विश्वचषकात पहिल्यांदाच सहभागी झालेल्या केप व्हर्डेने इतिहास रचत बाद फेरीसाठी पात्रता मिळवली आहे. स्पेनने ग्रुप एचमधील अखेरच्या सामन्यात उरुग्वेवर १-० असा निसटता विजय मिळवला. या पराभवासह दोन वेळच्या विश्वविजेत्या उरुग्वेचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. उरुग्वेला तीनही साखळी सामन्यांत एकही विजय मिळवता आला नाही.

सामन्याच्या ४२व्या मिनिटाला अ‍ॅलेक्स बाएना याने केलेला गोल निर्णायक ठरला. उरुग्वेचा अनुभवी गोलरक्षक फर्नांडो मुस्लेरा याच्या चुकीचा स्पेनने पुरेपूर फायदा घेतला. बाएनाचा फटका अडवण्यात मुस्लेराला अपयश आल्याने चेंडू थेट जाळ्यात गेला. या विजयासह स्पेनने सात गुणांसह ग्रुप एचमध्ये अव्वल स्थान पटकावले. आता स्पेनचा सामना ग्रुप जेमधील उपविजेत्या संघाशी म्हणजे ऑस्ट्रिया किंवा अल्जेरिया यांच्यापैकी एका संघाविरुद्ध होणार आहे. दरम्यान, सौदी अरेबिया आणि केप व्हर्डे यांच्यातील सामना गोलशून्य बरोबरीत संपला, मात्र या एका गुणामुळे विश्वचषकात पदार्पण करणाऱ्या केप व्हर्डेने इतिहास रचत बाद फेरीत प्रवेश केला.

# आयर्लंडचा ऐतिहासिक विजय!

## टीम इंडियाचा ३४ धावांनी पराभव

**बेलफास्ट : वृत्तसंस्था**

बेलफास्ट येथे झालेल्या पहिल्या टी-२० सामन्यात आयर्लंडने विश्वविजेता भारताचा ३४ धावांनी पराभव करत इतिहास रचला. कोणत्याही फॉरमॅटमध्ये भारताविरुद्ध आयर्लंडचा हा पहिलाच विजय ठरला. विशेष म्हणजे आयर्लंडचे काही प्रमुख खेळाडू संघात नसतानाही त्यांनी दमदार कामगिरी करीत भारताला धक्का दिला आहे. पहिल्या सामन्यातून हे स्पष्ट झाले की, भारताला मर्यादित नेट सत्रांमुळे स्थानिक परिस्थिती आणि खेळपट्टीशी पूर्णपणे जुळवून घेता आले नाही. दुसरीकडे आयर्लंडने घरच्या मैदानाचा पुरेपूर फायदा घेतला आणि प्रत्येक विभागात प्रभावी कामगिरी केली.



नाणेफेक जिंकल्यानंतर भारताने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, हा निर्णय अपेक्षित ठरला नाही. सुरुवातीला आयर्लंडने काही विकेट्स गमावल्या असल्या तरी कर्णधार लॉर्कन टकर याने संयमी अर्धशतक झळकावत डाव सावरला. त्यानंतर गॅरेथ डेलानी याने आक्रमक फलंदाजी करत भारताच्या गोलंदाजांवर दबाव निर्माण केला आणि आयर्लंडला १८२ धावांपर्यंत पोहचवले.

भारताच्या फलंदाजीत अभिषेक शर्माने अवघ्या २० चेंडूंत अर्धशतक झळकावत संघर्ष केला. मात्र, संजू सॅमसन, इशान किशन व कर्णधार श्रेयस अय्यर यांच्यासह वरच्या फळीला मोठी खेळी करता आली नाही. त्यामुळे भारतावर सतत दबाव राहिला. गोलंदाजीत आयर्लंडचा मध्यमगती गोलंदाज मॅट हॉलार्ड सामन्यात निर्णायक ठरला. त्याने अचूक गोलंदाजी करत इशान किशन, श्रेयस अय्यर आणि वॉशिंग्टन सुंदर यांच्या महत्त्वाच्या विकेट्स घेतल्या. त्याच्या प्रभावी स्पेलमुळे भारताचा डाव विस्कळीत झाला. पहिल्याच टी-२० सामन्यातील या विजयासह आयर्लंडने इतिहास रचला, तर भारतासाठी हा पराभव आगामी सामन्यांपूर्वी इशारा मानला जात आहे. मालिकेत पुनरागमन करण्यासाठी भारतीय संघाला फलंदाजी, गोलंदाजी आणि स्थानिक परिस्थितीशी जुळवून घेण्यावर अधिक भर द्यावा लागणार आहे.

# भारत हरला, पण अभिषेक शर्मा चमकला

**बेलफास्ट : वृत्तसंस्था**

आयर्लंडविरुद्ध पहिल्या टी-२० सामन्यात भारताला ३४ धावांनी पराभव स्वीकारावा लागला, मात्र या पराभवातही सलामीवीर अभिषेक शर्माने आपल्या स्फोटक फलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्याने अवघ्या २० चेंडूंमध्ये अर्धशतक झळकावत एकाच वेळी अनेक विश्वविक्रम आपल्या नावावर केले. अभिषेकने ५० धावांची खेळी करताना ७ चौकार आणि २ षटकार ठोकले. त्याचा स्ट्राईक रेट तब्बल २५० होता.

अभिषेकने कारकिर्दीत पाचव्यांदा २० किंवा त्यापेक्षा कमी चेंडूंमध्ये अर्धशतक झळकावले. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पूर्ण सदस्य देशांच्या फलंदाजांमध्ये असा पराक्रम करणारा तो जगातील पहिलाच खेळाडू ठरला आहे. त्याचबरोबर आयर्लंडविरुद्ध जलद अर्धशतक करणारा भारतीय फलंदाज होण्याचाही मान त्याने पटकावला.




# वैभवला न खेळवल्याने मायकल वॉनचा संताप

**मुंबई : प्रतिनिधी**

टी-२० क्रिकेट वर्ल्डकप स्पर्धेतील विजेतेपद राखल्यानंतर प्रथमच आंतरराष्ट्रीय सामना खेळणाऱ्या भारतीय क्रिकेट संघाला पराभवास सामोरे जावे लागले. आयर्लंडविरुद्धच्या या सामन्यात गोलंदाजी आणि फलंदाजीत चांगली सुरुवात केल्यावरही भारतास ३४ धावांनी एकतर्फी पराभव स्वीकारावा लागला. आयर्लंडने यामुळे प्रथमच भारताविरुद्धची टी-२० लढत जिंकली. या सामन्यामध्ये वैभव सूर्यवंशीला न खेळवल्याने चाहत्यांची निराशा झाली. अशातच याचाच धागा पकडत इंग्लंडचा माजी कर्णधार मायकेल वॉन याने भारतीय टीम मॅनेजमेंटवर टीका केली आहे.



मला विश्वास बसत नाही की त्यांनी वैभव सूर्यवंशीची निवड केली नाही, जो आताचा टी-२० मध्ये जगातील जबरदस्त खेळाडू असल्याचं मायकेल वॉनने म्हटलं आहे. यासंदर्भात मायकेल वॉनने सोशल मीडियावर माहिती दिली आहे. एकंदरीतच सर्वांना वाटलं होतं की वैभव आंतरराष्ट्रीय पदार्पण करणार पण तसे काही झाले नाही. भारताने वर्ल्डकप विजेतेपदानंतर आपला कर्णधार बदलला होता. घरच्या मैदानावर खेळणाऱ्या आयर्लंडला आपल्या संघात प्रमुख गोलंदाज नाहीत हे सतावत होते. त्यामुळे भारतीय धावांची आतषबाजी करतील अशीच अपेक्षा व्यक्त केली जात होती. त्यातच भारताने आयर्लंडची ४ बाद ५१ अशी सुरुवात केली. त्यामुळे सामना पूर्ण ४० षटकांचा होईल का, हाही प्रश्न होता.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com